cmyk

## संपादकीय

### फुकट चा अव्यवहारीपणा करू नका

शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी भारतासारख्या देशात किंवा राज्यांमध्ये कर्जमाफी झाल्याची उदाहरणे आहेत. पण, त्यातून खरोखरच शेतकऱ्याच्या अडचणी दूर झाल्या का, मूळ दुखणे संपले का, हा खरा प्रश्न आहे. त्याऐवजी शेतकऱ्यांच्या मालाला हमी भाव देण्याकरिता मात्र हात आखडता घेतला जातो. ही आपल्या यंत्रणेची शोकांतिका आहे. अर्थात अशा योजनांमुळे एखादे सरकार सत्तेवर येण्याचा मार्ग सुकर होत असला, तरी त्यातून संबंधित राज्याच्या अर्थकारणाला बसणारा फटका हा दीर्घकालीन असतो, हे लक्षात घेतले पाहिजे.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२९६ | रविवार दि.२२ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### अमेरिकेचा व्यापार करातात्काळ स्थगित करा

नवी दिल्लीः अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने आयात शुल्काबाबत दिलेल्या निर्णयानंतर काँग्रेसने केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे. भारत–अमेरिका व्यापार करार तात्काळ स्थगित करण्याची मागणी काँग्रेसने केली आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली आणि आरोप केला की ते तडजोडीच्या स्थितीत आहेत आणि त्यांचा देशाशी असलेला विश्वासघात आता उघड झाला आहे. राहुल गांधी यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की पंतप्रधान तडजोडीच्या स्थितीत आहेत. ते या व्यापार करारावर पुन्हा चर्चा करू शकणार नाहीत किंवा त्यात सुधारणा करू शकणार नाहीत आणि पुन्हा शरण जातील. याव्यतिरिक्त, काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले की भारत–अमेरिका व्यापार करार निलंबित करावा.

### महाड पोलीस निरीक्षकाचा आत्महत्येचा इशारा

महाडः महाड पोलीस निरीक्षक रमेश बामन्या तडवी यांनी राज्याचे पोलीस महासंचालक यांना पत्र लिहून थेट आत्महत्येचा इशारा दिला आहे. लिहिलेल्या लेखी पत्रात आपल्या विरोधात आपण खालच्या जातीचे असल्याचे सांगत अन्यायकारक कार्यवाही झाली आहे. आपली पुन्हा बदली केल्याचे नमूद करून याप्रकरणी न्याय न मिळाल्यास आपण लवकरच टोकाचे पाऊन उचलणार आहे. असा लेखी इशारा पत्राद्वारे दिल्याने संपूर्ण रायगड मधील पोलीस खात्यासह एकच खळबळ उडाली आहे. आपण भिल्ल आदिवासी म्हणजेच खालच्या जातीचे असल्यानेच आपली जाणीवपूर्वक बदली अलिबाग पोलीस नियंत्रण कक्षात करण्यात आल्याचे पत्रात नमूद केले आहे. हे सर्वथा अयोग्य असून याकरिता त्यांनी तत्कालीन रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, विद्यमान जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे, श्रीवर्धन उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हा शाखा अलिबाग मिलिंद खोपडे व महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने हे जबाबदार असल्याचे म्हटले आहे.

### एसटी कर्मचाऱ्यांना थकित पगार मिळणार

मुंबईः एसटीच्या सुमारे ८६ हजार कर्मचाऱ्यांचे वेतनवाढीचे थकित हप्ते देण्यासाठी शासनाने तातडीने १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे, लवकरच फेब्रुवारी महिन्याच्या वेतनासोबत देण्यात येणारा वेतनवाढीचा थकित हप्ता कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल, अशी माहिती परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. तसेच या अनुषंगाने येत्या २४ फेब्रुवारीला काही कामगार संघटनांनी पुकारलेले आंदोलन मागे घ्यावे, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे. मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी कर्मचाऱ्यांना वेतनवाढीचा थकित हप्ता देण्यासाठी एसटी महामंडळाकडे पैसे नसल्यामुळे शासनाने ती जबाबदारी उचलावी. अशी चर्चा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी केली होती.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

**बीड, दि.२१ फेब्रुवारी २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: २१.०० क्विंटल** | | |
| २,१०० | २,७९९ | २,४६९ |
| **ज्वारी/हायब्रिड: ३१.५० क्विंटल** | | |
| २,००० | ४,१९१ | ३,११५ |
| **मका/लोकल: ३.५० क्विंटल** | | |
| १,५०० | १,५०० | १,५०० |
| **तूर : २५.०० क्विंटल** | | |
| ६,२७१ | ७,८०१ | ७,१८९ |
| **उडीद : ४.०० क्विंटल** | | |
| ५,७०० | ६,००० | ५,८५० |
| **बाजरी: ८.५० क्विंटल** | | |
| १,८०० | २,७९१ | २,३८४ |
| **मुग: १.०० क्विंटल** | | |
| ५,००० | ५,००० | ५,००० |
| **सोयाबीन: ३९.५० क्विंटल** | | |
| ५,२०० | ५,३०० | ५,२५० |
| **हरभरा: ३२.०० क्विंटल** | | |
| ५,००० | ५,०८० | ५,०२९ |

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांवर वसुलीचा तगादा वाढला

## शासनाच्या २६ नोव्हेंबर २०२५ च्या परिपत्रकाची अंमलबजावणी रखडली; पुनर्गठणाबाबत अनिश्चितता कायम, खरीप हंगाम उद्ध्वस्त दिलास्याच्या घोषणांनंतरही बँकांची वसुली सुरूच

**पुणे । प्रतिनिधी**

यंदाच्या खरीप हंगामात अतिवृष्टी, सततचा मुसळधार पाऊस आणि काही भागांत निर्माण झालेल्या पुरस्थितीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेक ठिकाणी उभे पीक वाहून गेले, तर काही ठिकाणी पाण्याच्या तळ्यात अडकून सडले. शेतीजमिनींची धूप झाली, पशुधन व घरांचेही नुकसान नोंदवले गेले. या सर्व पार्श्वभूमीवर शासनाने बाधित शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी २६ नोव्हेंबर २०२५ रोजी पीक कर्जाच्या वसुलीस स्थगिती व कर्ज पुनर्गठणाबाबत परिपत्रक जारी केले होते. परिपत्रकात



जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठण, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस एक वर्षाची स्थगिती, तसेच विविध प्रशासकीय सवलती अशा सात प्रकारच्या उपाययोजना जाहीर करण्यात आल्या. जिल्हा उपनिबंधक (डीडीआर) कार्यालयामार्फत बँकांना आवश्यक सूचना देऊन कर्ज पुनर्गठण व स्थगितीची अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले. कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यासही सांगितले गेले. मात्र प्रत्यक्षात या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याची बाब पुढे येत आहे. आर्थिक वर्षाच्या समाप्तीला अवघे काही दिवस शिल्लक असताना बँकांनी थकबाकी वसुलीला गती दिली आहे. काही भागांत बँक अधिकारी थेट शेतकऱ्यांच्या घरी जाऊन वसुलीचा तगादा लावत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

'स्थगितीचा शासन आदेश असताना वसुली का?' असा थेट सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत. नैसर्गिक आपत्तीमुळे उत्पन्न घटलेले, उत्पादन खर्च वाढलेला आणि बाजारभाव अनिश्चित असताना कर्जफेडीचा वाढता दबाव शेतकऱ्यांना दुहेरी कात्रीत अडकवत आहे. पुनर्गठण प्रक्रियेबाबत बँकांकडून स्पष्ट माहिती दिली जात नसल्याने संभ्रम अधिकच वाढला आहे. कर्जाची मुदतवाढ किती? व्याज सवलत मिळणार का? हप्त्यांची नव्याने आखणी कशी होणार? या प्रश्नांची उत्तरे अद्याप अस्पष्टच आहेत. डीडीआर कार्यालय व बँका यांच्यातील समन्वयाचा अभावही प्रकर्षाने जाणवत आहे.

▶▶ पान २ वर

### 'मुद्रा मोदी ते मुजरा मोदी' केंद्र सरकारच्या निर्णयावरून प्रकाश आंबेडकर यांची टीका

**मुंबई । प्रतिनिधी**



**वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. अमेरिकेने नुकत्याच घेतलेल्या काही निर्णयांचा दाखला देत, भारताने आपली 'धोरणात्मक स्वायत्तता' गमावली असून देश अमेरिकेच्या दबावाखाली झुकल्याचे टीका करत मुद्रा मोदी ते मुजरा मोदी'' अशा शब्दांत प्रकाश आंबेडकर यांनी संताप व्यक्त केला.**

६ फेब्रुवारी २०२६ रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एका कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली. या आदेशानुसार, भारताने आपल्या आर्थिक आणि परराष्ट्र धोरणांना अमेरिकेच्या हिताशी 'संरेखित' करण्याचे मान्य केल्यामुळे भारतीय वस्तूंवर लादलेले २५% अतिरिक्त शुल्क कमी करून ते १८ टक्क्यांवर करण्यात आले आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी या घडामोडीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना म्हटले की, अमेरिकेच्या अटी मान्य करणे म्हणजेच भारताने आपल्या सार्वभौमत्वाचे समर्पण करणे होय. ट्रम्प यांचा आदेश स्पष्ट करतो की, अमेरिका आता भारताच्या ऊर्जा निवडींवर (विशेषतः रशियाकडून होणारी तेल खरेदी) देखरेख ठेवणार आहे. रशियाकडून तेल खरेदी केल्यामुळे ट्रम्प प्रशासनाने भारतावर दंड म्हणून २५% अतिरिक्त

▶▶ पान २ वर

# मुख्यमंत्री सौर कृषी योजनेत १० हजार कोटींचा महाघोटाळा?

## उबाठा शिवसेना नेते अंबादास दानवे यांच्या दाव्याने राज्यात खळबळ

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

राज्यातील मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना संदर्भात तब्बल १०,००० कोटी रुपयांच्या कथित घोटाळ्याचा गंभीर आरोप समोर आला असून राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेते तथा ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी या प्रकरणी थेट आरोप करत काही खासगी कंपन्यांनी बनावट बँक गॅरंटी देऊन कंत्राटे मिळवल्याचा दावा केला आहे.

दानवे यांच्या आरोपानुसार,




एनओपीएल, ग्रीन, एनएसीओएफ आणि ओनिक्स या कंपन्यांनी कथितपणे बनावट बँक हमीपत्रे सादर करून कंत्राटे मिळवली. या प्रक्रियेत अधिकाऱ्यांच्या संगनमताचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणात महावितरण मधील काही अधिकारी

▶▶ पान २ वर

### देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा

दानवे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट निशाणा साधला आहे. अपारंपरिक ऊर्जा खात्याचा कारभार पारदर्शक असल्याचा दावा करणाऱ्या सरकारने या प्रकरणात सखोल चौकशी करावी, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि नुकसान झाल्यास वसुली करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.



### राज्यात अवकाळी पावसाचा अंदाज !

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील वातावरणात कमालीचा बदल झाला आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये उकाडा वाढला असून उन्हाचे चटके लागू लागले आहेत. राज्यातील तापमानात चढ–उतार पाहायला मिळत आहे. अशातच भारतीय हवामान विभागाने अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांना अवकाळी पाऊस झोडपून काढण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागात सोमवारी आणि मंगळवारी ढगाळ हवामानासह हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. ११ जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, राज्यातील काही भागात

▶▶ पान २ वर

# नो गो... मेसेज आल्यानंतरही विमान का पुढं गेलं ?

## रोहित पवारांची दिल्लीत पत्रकार परिषद, मोदी, शहा, राहूल गांधी यांना लक्ष घालण्याची विनंती

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी मत्यू झाला. त्यावर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी शनिवारी दिल्लीत पत्रकार परिषद घेउन अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.**




या पत्रकार परिषदेत त्यांनी जी व्हीएसआर कंपनीला मोठ्या लोकांचा सपोर्ट आहे. यातील काही लोक सत्तेत आहेत. या प्रकरणात राजकीय किंवा औद्योगिक षडयंत्र आहे. डीजीसीए च्या मोठ्या अधिकाऱ्यांचा यामध्ये समावेश असल्याचा आरोप करत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हेच या प्रकरणाला न्याय देऊ शकतात असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, या पत्रकार परिषदेत त्यांनी केंद्रीय मंत्री राम मोहन नायडू यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विनंती करतो राम मोहन नायडू यांचा राजीनामा घ्यावा. तसेच राहुल गांधी यांनी हे प्रकरण हाती घ्यावे अशी विनंती त्यांनी केली. विमानात मोठ्या प्रमाणात इंधन होते. त्याचबरोबर एक्स्ट्राचे इंधन देखील विमानात होते. फ्युल इम्बॅलन्सचा मेसेज आल्यानंतर देखील विमान पुढं नेले होते. नो गो मेसेज आल्यानंतर विमान का पुढं गेले? असा सवाल आमदार रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे. कॅप्टन अपूर्वा अग्रवाल आणि कॅप्टन लोकेश रामपाल यांचा का समावेश करण्यात आला आहे? यांना या विमानासंदर्भात काही माहिती आहे का? असा प्रश्न विचारत, ब्लॅक बॉक्स जळाला नाही यात मानवी हस्तक्षेप झाल्याचे त्यांनी म्हटले आहे.

▶▶ पान २ वर

### दादा भुसेंकडून संजय राऊतांविरोधातला अब्रुनुकसानीचा दावा मागे

**मालेगाव । प्रतिनिधी**



मालेगाव येथील न्यायालयात घडलेल्या घडामोडींनी राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना सुरुवात झाली. मंत्री दादा भुसे यांनी दाखल केलेल्या अब्रुनुकसानीच्या खटल्याच्या सुनावणीसाठी खासदार संजय राऊत स्वत: उपस्थित राहिले होते. या प्रसंगी दादा भुसे यांनीही सकारात्मक भूमिका घेतली. राऊत यांनी दिलगिरी व्यक्त केल्यानंतर आपण अब्रुनुकसानीचा दावा मागे घेत असल्याचे त्यांनी जाहीर केले. मालेगावच्या शेतकऱ्यांचा आणि नागरिकांचा संभ्रम, तसेच त्यांच्या भावना लक्षात घेता हा विषय वाढवण्यापेक्षा संपवणे योग्य असल्याचे त्यांनी सांगितले. हा विषय आता संपला आहे, असे स्पष्ट शब्दांत त्यांनी नमूद केले.

खासदार संजय राऊत यांनी न्यायालयात आणि माध्यमांसमोर स्पष्ट शब्दांत दिलगिरी व्यक्त केली. चुकीच्या माहितीच्या आधारे आपण मंत्री दादा भुसे यांच्यावर आरोप केल्याचे त्यांनी मान्य केले. विषय आता संपला आहे, असेही त्यांनी सांगितले. आपल्याला मिळालेली माहिती चुकीची

▶▶ पान २ वर


# कचरा व्यवस्थापनात कसूर केल्यास आता थेट फौजदारी कारवाई

## सर्वोच्च न्यायालयाचे सर्व राज्यांना निर्देश, १ एप्रिल पासून लागू होणार नियमावली

**दिल्ली । वृत्तसंस्था**

**स्वच्छ आणि आरोग्यदायी पर्यावरणाचा अधिकार हा मानवी जगण्याच्या अधिकाराचा अविभाज्य भाग आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील घनकचरा व्यवस्थापनाबाबत कठोर पावले उचलली आहेत.**

१ एप्रिल २०२६ पासून लागू होणाऱ्या नवीन नियमावलीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी न्यायालयाने सर्व राज्यांना पॅन–इंडिया निर्देश जारी केले असून, आता कचरा व्यवस्थापनातील हलगर्जीपणा



### जिल्हाधिकारी यांना असणार अधिकार

प्रत्येक नागरिकाला ओला, सुका आणि घातक कचरा वेगळा करण्यासाठी प्रवृत्त करणे हे या लोकप्रतिनिधींचे कर्तव्य असेल. या नवीन आदेशानुसार, जिल्हाधिकाऱ्यांना कचरा व्यवस्थापन पायाभूत सुविधांचे ऑडिट करण्याचे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्याचे अधिकार दिले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांना आता त्यांच्या कामाचे फोटोग्राफिक पुरावे जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करावे लागणार आहेत.

केवळ प्रशासकीय चूक न ठरता फौजदारी गुन्हा मानला जाणार आहे. न्यायमूर्ती पंकज मिथल आणि न्यायमूर्ती एस. व्ही. एन. भाटी यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, सध्याची पिढी कचरा व्यवस्थापनासाठी आणखी वाट पाहू शकत नाही. आर्थिक प्रगतीसोबतच कचऱ्याचे प्रमाणही वाढत असून, जर भारताला जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडीवर राहायचे असेल, तर कचरा व्यवस्थापनात १०० टक्के निकष पाळणे अनिवार्य आहे. विशेष म्हणजे, न्यायालयाने आता स्थानिक नगरसेवक, महापौर आणि प्रभाग सदस्यांवर स्त्रोत विलगीकरण मोहिमेचे नेतृत्व करण्याची वैधानिक

▶▶ पान २ वर

### संस्थावर होणार कारवाई

ज्या संस्था किंवा व्यक्ती या नियमांचे उल्लंघन करतील, त्यांच्यावर पहिल्या टप्प्यात दंड आणि सातत्याने दुर्लक्ष केल्यास पर्यावरण कायद्यांतर्गत थेट फौजदारी खटले चालवले जातील. यामध्ये जबाबदार अधिकाऱ्यांचाही समावेश असेल.

cmyk

अग्रलेख

# फुकट चा अव्यवहारीपणा करू नका

शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी भारतासारख्या देशात किंवा राज्यांमध्ये कर्जमाफी झाल्याची उदाहरणे आहेत. पण, त्यातून खरोखरच शेतकऱ्याच्या अडचणी दूर झाल्या का, मूळ दुखणे संपले का, हा खरा प्रश्न आहे. त्याऐवजी शेतकऱ्यांच्या मालाला हमी भाव देण्याकरिता मात्र हात आखडता घेतला जातो. ही आपल्या यंत्रणेची शोकांतिका आहे. अर्थात अशा योजनांमुळे एखादे सरकार सत्तेवर येण्याचा मार्ग सुकर होत असला, तरी त्यातून संबंधित राज्याच्या अर्थकारणाला बसणारा फटका हा दीर्घकालीन असतो, हे लक्षात घेतले पाहिजे. हे बघता सर्वोच्च न्यायालयाने मोफत गोष्टी वाटण्यापेक्षा रोजगार द्या, अशा शब्दांत राज्य सरकारांवर ओढलेले ताशेरे महत्त्वाचे म्हटले पाहिजेत. कोणतीही गोष्ट फुकट दिली, तर त्याचे मोल राहत नाहीत, अशी जुनीजाणती मंडळी सांगत असत. त्यांचा हा अनुभव अगदी तंतोतंत खरा आहे, असे म्हणता येईल.

'मुफ्त का चंदन, घिस मेरे नंदन,' अशा आशयाची हिंदीत एक म्हण आहे. तर मराठीतही 'फुकट ते पौष्टिक'पासून अनेक शब्दप्रयोग रूढ आहेत. या म्हणींतून फुकटच्या गोष्टींचे किंवा रेवड्यांचे लोकांना कसे आणि किती आकर्षण असते, हेच ध्वनित होते. 'खोबरं तिकडं चांगभलं' ही वृत्ती समाजात वर्षानुवर्षे नांदतेच आहे. स्वाभाविकच राज्य सरकारकडून जेव्हा मोफत योजना आणल्या जातात, तेव्हा त्या प्रचंड लोकप्रिय होतात, हा आजवरचा इतिहास आहे. एकेकाळी मोफत टीव्ही किंवा तांदूळ वा धान्याच्या घोषणांनी त्या-त्या राज्यांमध्ये सरकारे कशी निवडून आली, याच्या आठवणी आजही काढल्या जातात. लाडली बहीण किंवा लाडकी बहीण योजना हे त्याचे ताजे उदाहरण. मध्य प्रदेशात बॅकफुटवर असलेल्या भाजपाला या योजनेने तारले. त्यानंतर महाराष्ट्रातील फोडाफोडी, त्यातून जनमानसात निर्माण झालेली असंतोषाची लाट भाजपने 'लाडकी बहीण'सारख्या योजनेतून कशी थोपवली, हेही आपण पाहिले आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी, मोफत वीज, पाणी वा तत्सम योजनाही आपल्यासाठी नवीन नाहीत. मोफत दिलेल्या गोष्टीचे तेवढ्यापुरते अप्रूप वाटते. नंतर त्याचे काहीच वाटेनासे होते, हा मानसशास्त्राचा सिद्धांत आहे. त्यामुळे फुकटच्या गोष्टींची समाजाला किती सवय लावायची, याचा विचार प्रत्येकाने करायला हवा. रेशनिंगवर फुकट दिले जाणारे धान्य काय किंवा वीज, पाणी काय, याच्या दुष्परिणामांचा अभ्यास आपल्याकडे फारसा कुणी करताना दिसत नाही. एकेकाळी कोकण पट्टा हे भातपिकाचे आगार म्हणून ओळखला जायचा. अतिशय चांगल्या दर्जाचा भात कोकणात पिकवला जात असे. मात्र, नोकरी धंद्यासाठी कोकणातील मंडळींनी मोठ्या प्रमाणात मुंबई-पुण्याकडे स्थलांतर केले. बाकी गावात राहिली, ती प्रामुख्याने वयस्कारी मंडळी. तरीदेखील कालपरवापर्यंत काही जण भाताचे पीक घेत असत. मात्र, रेशनिंगवर मोफत धान्य मिळू लागले आणि बऱ्याच मंडळींनी शेतीतून अंग काढून घेतले, असे दिसते. स्थलांतर, लहरी वा बदलते हवामान, निसर्गाचा प्रकोप, प्राण्यांची अति वाढती संख्या यांसारख्या गोष्टींमुळे निश्चितच कोकणच्या संस्कृतीपुढे काही आव्हाने निर्माण झाली. परंतु, रेवडीकरणामुळे येथील जीवनपद्धतीला फटका बसला, हे नाकारता येणार नाही. कोकण हे याचे एक प्राथमिक उदाहरण झाले. तथापि, अनेक भागांमध्ये, राज्यांमध्ये सध्या हीच परिस्थिती आहे. म्हणूनच मोफत धान्य, शेतकरी सन्मान, कर्जमाफी यांसारख्या लोकानुनयी योजना देण्याऐवजी शेतकऱ्यांना, लोकांना स्वावलंबी करता येईल, अशा योजना सरकारने दिल्या पाहिजे. मोदी सरकारने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू, दीड पट हमीभाव देऊ, यांसारख्या घोषणा दिल्या होत्या. खरे तर या आघाडीवर कोणत्याही सरकारने काम करणे अपेक्षित होते वा आहे. पण, या घोषणेचे पुढे काय झाले, हे कळायला मार्ग नाही. खरोखरच शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट झाले, त्याच्या पिकाला चांगला हमीभाव मिळाला, तर त्याला सरकार असो, सावकार असो वा आणखी कुणी असो. त्यांच्यापुढे हातपाय पसरायला लागणार नाहीत. म्हणूनच ठायीठायी आत्मनिर्भरतेच्या गोष्टी करणाऱ्यांनी लोकांना खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर करण्यासाठी काय करता येईल, कोणत्या योजना आणता येतील, हे पहायला हवे. यासंदर्भात न्यायालयाने उपस्थित केलेले मुद्देही अतिशय महत्त्वाचे म्हणावे लागतील. तुम्ही लोकांच्या खात्यात थेट पैसे जमा करणार असाल, तर लोक काम करतील का, असा सवाल न्यायालयाने केला आहे. तो यथोचितच म्हणायला हवा.

भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. आज संपूर्ण जगात आपला देश लोकसंख्येतही अग्रस्थानी पोहोचला आहे. इतक्या लोकसंख्येच्या देशाने लोकांची क्रयशक्ती वाढवायची की कमी करायची, हे एकदा ठरवले पाहिजे. लोकप्रियता वा सवंग घोषणा, या अळवावरच्या पाण्यासारख्या असतात. त्यांना फार आयुष्य नसते. पण, त्यातून होणारे नुकसान मोठे असते. उद्याच्या जगात टिकायचे असेल, तर कुठल्याही राज्याला असा अव्यवहारीपणा करून चालणार नाही. म्हणूनच आपल्या राज्यात पायाभूत सुविधा वाढवणे, उद्योग धंद्यांना पूरक वातावरण तयार करणे, रोजगारक्षमता वाढवणे, राज्याचे दरडोई उत्पन्न वाढवणे, यावर भर हवा. त्यातूनच राज्याला किंवा देशाला पुढे नेता येईल. १९९१ मध्ये भारताने खुले आर्थिक धोरण स्वीकारले. तेव्हापासून आर्थिक आघाडीवर आपली घोडदौड सुरू आहे. देशाने अलीकडेच चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणूनही झेप घेतली आहे. अनेक चढ उतारांमध्येही भारताने आपला आर्थिक विकास दर टिकवून ठेवला आहे. लवचिक अर्थव्यवस्था, हेच या यशाचे गमक मानले जाते. परंतु, रेवडी संस्कृतीचा अतिरेक होणे धोकादायक ठरू शकते. हे बघता सावध ऐका, पुढल्या हाका, हा कानमंत्र ध्यानी घ्यावा लागेल.

# खर्डेवाडी येथे गुरुवारपासून श्रीमद् भागवत कथा सोहळ्याला प्रारंभ

**बीड । प्रतिनिधी**

**जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या त्रिशतकोत्तर बीज उत्सवानिमित्त तसेच किसनराव कळेकर आणि कै. रत्नदीप भागवत कळेकर यांच्या पुण्यस्मरणार्थ खर्डेवाडी (ता. बीड) येथे गुरुवार दि. २६ फेब्रुवारी २०२६ पासून श्रीमद्? भागवत कथा सोहळ्याचा शुभारंभ होत आहे.**





नांदूर फाट्याजवळील खर्डेवाडी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही तुकाराम बीज उत्सव मोठ्या भक्तीभावात व उत्साहात साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने ह.भ.प. रामचंद्र महाराज जगताप (बीड) यांच्या वाणीतून श्रीमद्? संगीत भागवत कथा निरूपण होणार आहे. दररोज दुपारी १ ते ५ या वेळेत भागवत होईल. सोहळ्यादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दररोज सायंकाळी ६ ते ७ या वेळेत खर्डेवाडी भजनी मंडळाचा हरिपाठ होणार आहे. या श्रीमद्? भागवत कथा सोहळ्याच्या निम्मित तीन दिवस कीर्तनाचे आयोजित करण्यात आले आहेत.यामध्ये ह भ प श्रीनिवास महाराज जगताप,पालसिंगण, ह भ प नारायण महाराज शिरसट आणि ह भ प केशवदास वैष्णव महाराज हिंगणी यांचे हरिकीर्तन होणार आहे या कीर्तनाला गावातील प्रतीक नागरिकांनी सौजन्य केले आहे . 'ज्ञानोबा-तुकोबा आपल्या घरी' या उपक्रमांतर्गत ह.भ.प. हरिदास महाराज सोळंके आणि ज्ञानेश्वरी भावकथा प्रवक्ते ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या संयोजनातून ज्ञानेश्वरी व तुकाराम गाथा या ग्रंथांची स्नेहभेट साधकांना देण्यात येणार आहे. भागवत कथा समाप्ती व जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज बीज उत्सवानिमित्त दि. ५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत ह.भ.प. राजन महाराज भोसले यांचे काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर कार्यक्रमाची सांगता होणार आहे. सात दिवस चालणाऱ्या या भागवत कथेचा श्रवणाचा लाभ पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन आयोजक समस्त कळेकर परिवार,महादेव (नाना )साळुंके बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# लिंबागणेश येथे बुलढाणा जिल्ह्यातील चिखला गावातील शिवस्मारक वादातील अमानुष मारहाण प्रकरणाचा निषेध; दोषींवर कठोर कारवाईची मागणी

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक अस्मितेला धक्का देणारी घटना चिखला गाव येथे घडली असून शिवस्मारक उभारणीच्या वादातून मराठा समाजातील बांधव व महिलांवर दगडफेक व अमानुष मारहाण करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे.**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाच्या उभारणीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या घटनेत संजीवनी वाघ यांच्यासह अन्य महिलांवर हल्ला करण्यात आल्याचा आरोप आहे. स्त्रीसन्मान व न्यायाची शिकवण देणाऱ्या शिवरायांच्या विचारांना ही घटना काळीमा फासणारी



असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे शिवप्रेमींनी तीव्र संताप व्यक्त करत छत्रपती शिवाजी महाराज चौकात घोषणाबाजी केली. मराठा सेवक डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज सकाळी निदर्शने करण्यात आली. निदर्शनादरम्यान राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लेखी निवेदन पाठवून प्रशासनाने निष्पक्ष व तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थितांना संयम राखत लोकशाही मार्गाने लढा देण्याचे आवाहन केले. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ आप्पा गिरे, कल्याण वाणी, बाळकृष्ण थोरात, भगवान मोरे, ॲड. गणेश वाणी, दामोदर थोरात, महादेव कुदळे, विक्रांत वाणी, सर्पमित्र अशोक जाधव, अशोकराजे वाणी, सुरेश निर्मळ, दादा गायकवाड, सुरेश ढवळे, नाना वाणी,महावीर जाधव, अक्षय नाईकवाडे, संजय पावले, रामदास मुळे, केशव गिरे, गहिनीनाथ वाणी, राजेभाऊ पाटील, रामा वाणी, भगवान लगास आदी उपस्थित होते.

# मुंबईत पर्यावरण विभागाचा 'माझी वसुंधरा' राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा थाटात

**मुंबई । प्रतिनिधी**

**पर्यावरण रक्षणासाठी माझी वसुंधरा अभियानाच्या माध्यमातून सुरु असलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. माझी वसुंधरा अभियानाला आता लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त आहे. भावी पिढीच्या निरोगी आयुष्यासाठी जनसामान्यांच्या मदतीने हाती घेतलेले हे ईश्वरीय कार्य आहे, असे उद्गार राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी काढले. रासायनिक शेती, पर्यावरणीय बदल आरोग्यासाठी घातक असून या अभियानाची कृषि क्षेत्राशी सांगड घालण्याची गरज अधोरेखित करून नैसर्गिक शेतीचा पुरस्कार करण्याचे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी यावेळी केले.**



वरळी एनएससीआय डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने आयोजित माझी वसुंधरा राज्यस्तरीय सन्मान सोहळा राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग मंत्री पंकजाताई मुंडे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी माझी वसुंधरा मिशन ४.० आणि ५.० अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पर्यावरणासाठी शासन स्तरावर पहिल्यांदाच एवढ्या व्यापक प्रमाणात आणि प्रभावी पद्धतीने मोहिम राबविल्याबद्दल पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांचे राज्यपाल श्री. देवव्रत यांनी अभिनंदन केले. ते पुढे म्हणाले की, पर्यावरण रक्षण हे संपूर्ण जगासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. ग्लोबल वार्मिंगमुळे तापमान वाढू लागले आहे. नैसर्गिक संकट ओढावण्याची भिती जागतिक पातळीवर व्यक्त केली जात आहेत. निसर्गाचे, पर्यावरणाचे रक्षण करणे हे जीवसृष्टीसाठी महत्वाचे आहे. या अभियानाच्या माध्यमातून सुरु असलेले कार्य हे ईश्वरीय सेवा आहे असेही राज्यपाल यांनी सांगितले. पर्यावरण रक्षणासाठी राज्यपालांनी यावेळी पंचसूत्री मांडली. पर्यावरणाचे संवर्धन विकास धोरणाच्या केंद्रस्थानी ठेवून, प्रत्येक विकास प्रकल्पात ''ग्रीन ऑडिट'' अनिवार्य करावे. स्थानिक पातळीवर हरित अर्थव्यवस्थेला चालना देऊन, स्थानिक स्वराज्य संस्थांनी ''ग्रीन बजेट'' तयार करावे आणि कचरा व्यवस्थापन, सौर ऊर्जा, पावसाच्या पाण्याचे संकलन तसेच नैसर्गिक शेतीला आर्थिक प्रोत्साहन द्यावे. पर्यावरण शिक्षणास प्रोत्साहन देवून, माझी वसुंधरा अभियानाच्या माध्यमातून जनसहभागाला चळवळीचे स्वरूप द्यावे आणि प्रत्येक नागरिक ''क्लायमेट वॉरियर'' बनवावा. डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे वृक्षारोपण, जलसंधारण आणि प्रदूषण नियंत्रणाची रिअल-टाइम पाहणी व्यवस्था निर्माण करावी, जेणेकरून पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित होईल. ''माझी वसुंधरा'' अभियान हे सर्वांनी ध्येय म्हणून स्वीकारल्यास नक्कीच अपेक्षित बदल घडेल, असा विश्वासही राज्यपालांनी यावेळी व्यक्त केला.

# मोबाईल-मुक्त सायंकाळ हा संस्कारक्षम व सशक्त समाज घडविण्याचा प्रभावी मार्ग - केंद्रप्रमुख गणेश धाईतिडक



**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाहेगव्हाण येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने शाळेच्या वतीने गावातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत गावातील शिवप्रेमी नागरिक, तरुण युवक मंडळ, पालक वर्ग तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. मुंजाबा डांबे, उपाध्यक्ष श्री. सोमनाथ मस्के व शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींनी शिवचरित्रावर आधारित प्रभावी भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली.**

शिवजन्मोत्सवानिमित्त शिवजन्मोत्सव समिती बाहेगव्हाण व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाहेगव्हाण यांच्या संयुक्त विद्यमाने सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना श्री. नागवे सर यांच्या तर्फे बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी केंद्रप्रमुख व शाळेचे मुख्याध्यापक श्री. गणेश धाईतिडक यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे महत्त्व विशद करत शिवजयंतीनिमित्त सर्व गावकऱ्यांनी दररोज संध्याकाळी ७ ते ९ या वेळेत 'मोबाईल-फ्री वेळ' पाळण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. या वेळेत मोबाईलचा वापर टाळून पालकांनी आपल्या पाल्यांशी संवाद साधावा, विद्यार्थ्यांनी अभ्यास, वाचन व चांगल्या सवयी जोपासाव्यात, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या या आवाहनाला उपस्थित गावकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत हा उपक्रम राबविण्याचे मान्य केले व शिवजयंतीनिमित्त त्यासाठी संकल्प केला. तसेच विद्यार्थ्यांनी शिवचरित्र व देशभक्तीपर गीतांवर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आकर्षक सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक श्री. भास्करे सर, श्रीमती बडदे मॅडम, श्रीमती सौंदरमल मॅडम, श्रीमती तारळकर मॅडम, श्री. मुंडे सर व श्री. भुते सर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन श्रीमती बडदे मॅडम यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. भास्करे सर यांनी मानले. शिवजयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आदर, प्रेरणा व देशभक्तीची भावना निर्माण होण्याबरोबरच समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची प्रेरणाही मिळाली.

## पान १ वरून...

### अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांवर

कार्यवाही अहवाल प्रलंबित असल्याची माहिती समोर येत असून, शासन निर्णय आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये मोठी दरी असल्याचे चित्र दिसत आहे. दिलास्याच्या घोषणा कागदावरच राहणार की त्याचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांना मिळणार, हा प्रश्न आता अधिक तीव्र झाला आहे. शेतकरी संघटनांनी शासनाने तातडीने हस्तक्षेप करून स्पष्ट मार्गदर्शक सूचना जाहीर कराव्यात, पुनर्गठण व स्थगितीची प्रक्रिया जिल्हानिहाय पारदर्शकपणे राबवावी आणि बँकांकडून होणारा वसुलीचा तगादा तत्काळ थांबवावा, अशी मागणी केली आहे. आता कर्ज पुनर्गठण आणि वसुली स्थगितीची प्रभावी अंमलबजावणी नेमकी केव्हा होणार? शासनाच्या निर्णयाचा प्रत्यक्ष दिलासा शेतकऱ्यांच्या दारात पोहोचणार की नाही? असे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

------------

### मुख्यमंत्री सौर कृषी योजनेत

आणि संबंधित कंपन्यांचे संचालक दिव्येश सावलिया, पी. सुरेश बाबू आदींची नावे दानवे यांनी घेतली आहेत. दानवे यांनी दावा केला की आर्थिक गुन्हे शाखेकडे या संदर्भात पाच गुन्हे दाखल झाले असून, ही अत्यंत गंभीर बाब आहे. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या सौर योजनेतच अनियमितता झाल्याचा आरोप असल्याने प्रकरण अधिक संवेदनशील ठरत आहे. या गंभीर आरोपांवर अद्याप सरकारकडून अधिकृत सविस्तर प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, आरोपांमुळे सौर कृषी योजनेच्या अंमलबजावणीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या पार्श्वभूमीवर आता या प्रकरणात चौकशीची दिशा काय असणार आणि प्रत्यक्षात घोटाळा झाला आहे का, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

-------

### 'मुद्रा मोदी ते मुजरा मोदी' केंद्र सरकारच्या

टॅरिफ लादले होते. मात्र, आता हे टॅरिफ काढले असले तरी, त्यासाठी भारताला रशियाकडून तेल खरेदी बंद करण्याची आणि अमेरिकेच्या सूचनांचे पालन करण्याची अट घालण्यात आल्याचा आरोप ॲड. प्रकाश आंबेडकर आंबेडकरांनी केला आहे. प्रकाश आंबेडकर यांनी ३० जानेवारी २०२६ रोजी अमेरिकेच्या न्याय विभागाने प्रसिद्ध केलेल्या जेफ्री एपस्टीन संबंधित फाईल्सचा दाखला दिला. २०१७ मधील एका ईमेलमध्ये पंतप्रधान मोदींचा उल्लेख असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. भारतीय पंतप्रधान अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या फायद्यासाठी इस्रायलमध्ये नाचले आणि गायले, हे एपस्टीनचे वाक्य भारताच्या प्रतिष्ठेला धक्का लावणारे आहे, असे ते म्हणाले. परराष्ट्र धोरणांच्या बाबतीत एका गुन्हेगाराकडून सल्ला घेतला जात होता का? असा सवालही यावेळी त्यांनी उपस्थित केला.

----------

### दादा भुसेंकडून संजय राऊतांविरोधातला

होती आणि त्यातून गैरसमज निर्माण झाला, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच मालेगावच्या शेतकऱ्यांची माफी मागत संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न केला. वादाची पार्श्वभूमी १७८ कोटी रुपयांच्या कथित शेअर्स घोटाळ्याशी संबंधित होती. संजय राऊत यांनी सामाजिक माध्यमांवर हा आरोप केला होता. दादा भुसे यांनी तो आरोप पूर्णपणे खोटा असल्याचे सांगत आधीच स्पष्टीकरण दिल्याचे नमूद केले. संबंधित सर्व पैसे आर्मस्ट्राँग कंपनीकडे ट्रान्सफर झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. तरीही आरोप मागे घेतले गेले नाहीत, म्हणूनच मानहानीचा खटला दाखल करण्यात आला होता. यावेळी दादा भुसे यांनी सांगितले की, काही व्यक्तींनी चुकीची माहिती पसरवून हा वाद निर्माण केला. ज्यांच्याकडून माहिती आली तेही आता दुसऱ्या पक्षात गेले असल्याचे सूचक विधान करण्यात आले. अद्वय हिरे यांनी चुकीची माहिती दिल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. मात्र राऊत यांनी स्वत: आरोप मागे घेतल्याने आणि खोटेपणा मान्य केल्याने पुढील कारवाईची गरज उरली नसल्याचे भुसे यांनी स्पष्ट केले. संजय राऊत यांनीही दादा भुसे आणि माझे चांगले संबंध आहेत. ही महाराष्ट्राची संस्कृती आहे, असे म्हणत विषयाला मैत्रीपूर्ण शेवट दिला. राजकीय भूमिका वेगळी असली तरी वैयक्तिक पातळीवर संवाद आणि समज कायम असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. वाद वाढवण्यापेक्षा संपवणे योग्य असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. एकंदरीत, न्यायालयात सुरू झालेला हा वाद अखेर समझोत्याने मिटला.

-----------

### नो गो... मेसेज आल्यानंतरही

हे विमान ३५ कोटीला विकत घेतले होते तर या विमानाचा ५५ कोटी रूपयांचा विमा काढला होता, असे ते म्हणाले. रोहित पवार यांनी पुन्हा एकदा केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांचे आणि व्हीएसआर कंपनीचे कसे संबंध आहेत हे सांगत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

-------------

### राज्यात अवकाळी

सोमवारी आणि मंगळवारी ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांमध्ये ढगांच्या गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. सोमवारी अहिल्यानगर, सांगली, सोलापूर, बीड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांत ढगाळ वातावरणासह काही ठिकाणी ढगांच्या गडगडाटासह हलक्या स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. तर मंगळवारी सोलापूर, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात ढगाळ वातावरणासह काही ठिकाणी ढगांच्या गडगडाटासह हलक्या स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. या अवकाळी पावसाच्या अंदाजामुळे बळिराजा चिंतेत आहे. या अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. कांदा, गव्हासह अन्य पिकांना फटका बसण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे.

------------

### कचरा व्यवस्थापनात कसूर केल्यास

जबाबदारी सोपवली आहे. तळागाळापर्यंत जनजागृती करण्यासाठी या नियमावलीचा स्थानिक भाषांमध्ये अनुवाद करण्याचे आणि शालेय अभ्यासक्रमात कचरा व्यवस्थापनाचा समावेश करण्याचे निर्देशही न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत. ''आता नाही तर कधीच नाही'' अशा कडक शब्दांत ताकीद देत, न्यायालयाने सर्व उच्च न्यायालये आणि न्यायाधिकरणांनाही आपापल्या आवारात १ एप्रिलपासून या नियमांचे पालन सुनिश्चित करण्यास सांगितले आहे.


दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. २२ फेब्रुवारी २०२६



## थोडक्यात

### दहावीच्या विद्यार्थ्यांना मंडपात बसून परीक्षा द्यावी लागणे ही बाब नक्कीच दुर्दैवी – आ.प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी



बीड तालुक्यातील कुर्ला गावात दहावीच्या विद्यार्थ्यांना मंडपामध्ये बसून परीक्षा द्यावी लागत असल्याची बाब अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे. दहावीची परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक आयुष्यातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानली जाते. वर्षभर परिश्रमपूर्वक तयारी केलेल्या विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधांअभावी अशा असुविधाजनक परिस्थितीत परीक्षा द्यावी लागणे ही शिक्षण व्यवस्थेसाठी निश्चितच दुर्दैवी बाब आहे. मंडपामध्ये परीक्षा घेतल्यास उष्णता, वारा, ध्वनीप्रदूषण किंवा इतर नैसर्गिक अडथळ्यांमुळे विद्यार्थ्यांच्या एकाग्रतेवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आकस्मिक परिस्थितीत सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण होऊ शकतो.या पार्श्वभूमीवर संबंधित विभागाने या घटनेची तात्काळ दखल घेऊन पर्यायी पक्क्या इमारतीत परीक्षा केंद्र हलविण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा आ.प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केली आहे.

### टाळमृदंगाच्या जयघोषात पालखी सोहळ्याने उमरीत शिवजन्मोत्सव उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील उमरी( बु) येथे १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. टाळमृदंगाच्या गजरात आणि शिवाजी महाराज की जय च्या जयघोषात निघालेल्या भव्य पालखी सोहळ्याने संपूर्ण गाव दुमदुमून गेले.



शिवजन्मोत्सवानिमित्त उमरी येथे विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अखंड हरिनाम सप्ताह, भव्य बैलगाडा शर्यत तसेच विशेष आकर्षण असलेला पालखी सोहळा हे कार्यक्रम ग्रामस्थांच्या सहभागाने पार पडले.१९ फेब्रुवारी रोजी सकाळी आठ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात ध्वजारोहण करून पालखी सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिला, युवक व बालकांनी टाळमृदंगाच्या निनादात आणि शिवगर्जनेतून वातावरण भारावून टाकले. गावातील प्रमुख मार्गावरून पालखीची मिरवणूक काढण्यात आली. प्रत्येक ठिकाणी फुलांची उधळण व महाराजांची पुजा करून पालखीचे स्वागत करण्यात आले.पालखी सोहळ्याची सांगता रामेश्वर विद्यालय येथे झाली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा पाळणा घेऊन पारंपरिक पद्धतीने जन्मोत्सव साजरा करण्यात आला. लहान मुलांनी शिवचरित्रावर आधारित भाषणे सादर केली. त्यांच्या ओजस्वी वक्तृत्वाने उपस्थितांची मने जिंकली.या कार्यक्रमाला गावातील महिलांची विशेषतः मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. ग्रामस्थांनी एकजुटीने आणि उत्साहाने सहभाग घेत शिवजन्मोत्सवाची परंपरा जपली. संपूर्ण परिसरात भक्ती, उत्साह आणि शिवभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम, स्वराज्य निर्माण हे आजही प्रेरणादायी -डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**येथील महात्मा ज्योतिराव फुले स्मारक समिती व बुद्धिस्ट इंटरनॅशनल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६ वी जयंती मोठ्या उत्साहात स्मारक स्थळी साजरी करण्यात आली.**

यावेळी विचारमंचावर अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.अनिल नरसिंगे, बी.आय.एस.चे संचालक रत्नदीप गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवजयंतीची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले व घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण व अभिवादन करून करण्यात आली. यावेळी बोलताना सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनचरित्र हे केवळ इतिहास म्हणून न पाहता तो एक स्वतंत्र विचार म्हणून पाहणे गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांकडे महात्मा ज्योतिराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या चष्म्यातून पाहायला शिकले पाहिजे. जाती-धर्माच्या गरीबी श्रीमंतीच्या भेदापलीकडे जाऊन आठरापगड जातीचे स्वराज्य निर्माण करणे आणि ते यशस्विपणे पुढे नेणे, यामध्येच छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी, कार्य कुशलता, कर्तबगारी, सुशासन दिसून येते. शिवजयंतीच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज यांनी जरी मुस्लिमांविरूद्ध युद्ध केले, लढाया केल्या, तरी परंतु, छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यामध्ये मुस्लिम सरदार ही होते. मुस्लिम गुप्तहेर होते. तोफखान्याचे प्रमुख होते आणि यांनी स्वराज्यासाठी महाराजांच्या खांद्याला खांदा लावून आयुष्यभर संघर्ष केला हे मात्र सांगितले जात नाही. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त



शिवरायांच्या गनिमी काव्याचा युद्ध कौशल्याचा धार्मिक सहिष्णुतेचा न्यायप्रियतेचा, स्वातंत्र्य समता न्याय बंधुता या सूत्रीवर आधारित असलेली स्वराज्याची निर्मिती यावर भाष्य होणे गरजेचे आहे असे डॉ.इंगोले यांनी यावेळी सांगितले. राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली व सर्वप्रथम शिवजयंती साजरी करण्यास सुरूवात केली म्हणजेच शिवाजी महाराजांना त्यांनी आपल्या सामाजिक कार्याचा आदर्श मानलं होतं. संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले यांना आपलं गुरू मानलं होतं आणि आपल्या प्रत्येक पत्राची सुरूवात डॉ.आंबेडकर हे जय शिवाजी म्हणून करायचे आणि संविधान निर्माणानंतर त्यांनी एका मुलाखतीत सांगितलं होतं की, मला घटना लिहिताना काहीच अडचण आली नाही. कारण, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य आणि त्याचा आराखडा माझ्या डोळ्यांसमोर होता. हे महापुरूष कोणत्या एका जाती धर्माचे नव्हती. परंतु, त्यांनी एकमेकांच्या विचारांना कार्याला प्रमाण मानून त्यांची जीवनपद्धती संस्कार अवलंबिले आणि माणुसकीची चळवळ जिवंत ठेवली हेच नातं या महापुरूषांमध्ये होतं. काळाच्या ओघांमध्ये भारतामध्ये अनेक राजे महाराजे होऊन गेले. परंतु, ज्या महाराजांनी रयतेच्या मनामनावर राज्य केलं ज्यांचं नांव ऐकताच आजही आमच्या धमन्यांमध्ये रक्त सळसळू लागतं अशा आमच्या छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती ३९६ व्या वर्षी सुद्धा तेवढ्याच उत्साहात साजरी केली जाते. एवढे कर्तृत्व गाजविणारे एकमेव राजे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय या गौरवपूर्ण शब्दांत डॉ.इंगोले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना जयंतीनिमित्त शब्दांजली अर्पण केली. यावेळी बोलताना प्रा.अनिल नरसिंगे यांनी छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्व होते त्यांच्या स्वराज्यामध्ये जाती धर्माला थारा नव्हता तर कर्तबगारीला वाव होता. न्यायप्रियतेला वाव होता असे सांगितले. यावेळी बोलताना रत्नदीप गोरे यांनी लोककल्याणकारी राज्य कसे असावे याची प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याकडून घेता येईल कुशल संघटक कुशल सेनानी, गनिमी काव्याचा शोध लावणारे, बळीराजाचे हित साधणारे आणि सर्व जाती धर्मांना एकत्रित करणारे राजे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय असे सांगितले. यावेळी स्मारक समिती तर्फे परिसरामध्ये महापुरूषांच्या प्रतिमांची मिरवणूक काढण्यात येऊन महापुरूषांच्या नांवाच्या घोषणा व कार्याचा जागर करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रावर विविध विद्यार्थ्यांनी आपली मनोगत व्याख्याने व्यक्त केली तसेच शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित विविध गाणी व शिवचरित्र नृत्य,शिव वेशभूषा विद्यार्थ्यांनी यावेळी सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती नम्रता साठे यांनी केले. तर आभार प्रदर्शन श्रीमती सुषमा वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा फुले स्मारक समितीचे पदाधिकारी प्रा.आदित्य कदम, प्रा.हेमंत धानोरकर, प्रा.राजकुमार साळवी, श्रीमती ज्योती गोरे, प्रा.डॉ.मिलिंद ढगे, विजय कचरे यांनी प्रयत्न केले.

## संतभूमी अर्बनमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

संतभूमी अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.,बीड मुख्य कार्यालय बीड. येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अर्जुन राऊत, व्यवस्थापकीय संचालक (चऊ) ज्ञानेश्वर राऊत, संचालक मंडळातील सर्व सदस्य, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यालय परिसर आकर्षक सजावटीने नटलेला होता तसेच शिवरायांच्या विचारांचे फलक लावून प्रेरणादायी वातावरण निर्माण करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करून करण्यात आली. संस्थापक





अध्यक्ष अर्जुन राऊत व चऊ ज्ञानेश्वर राऊत यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. घोषणांमुळे कार्यक्रमाला एक वेगळाच उत्साह लाभला आणि उपस्थितांमध्ये शिवभक्तीची भावना जागृत झाली.

यानंतर कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना संस्थापक अध्यक्ष अर्जुन राऊत यांनी शिवाजी महाराजांचे शौर्य, दूरदृष्टी, स्वराज्य स्थापनेची जिद्द आणि लोककल्याणकारी प्रशासन यांचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, शिवरायांनी केवळ स्वराज्य निर्माण केले नाही तर आदर्श शासनव्यवस्थेची पायाभरणी केली. त्यांच्या नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि प्रजेसाठी असलेले प्रेम हे आजही सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. या मूल्यांचा आदर्श समोर ठेवून संतभूमी अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीची वाटचाल अधिक सक्षम व भक्कम करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. राऊत यांनी पुढे नमूद केले की, सहकार क्षेत्रात कार्य करताना प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि लोकाभिमुखता या तत्त्वांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. शिवरायांच्या प्रेरणेतून संस्थेचा सर्वांगीण विकास साधत ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी संस्थेचे अधिकारी व कर्मचारी सातत्याने प्रयत्नशील राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच संस्थेच्या प्रगतीत सर्व घटकांचा सहभाग महत्त्वाचा असून एकजुटीच्या बळावर संस्था निश्चितच नवीन उंची गाठेल, असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शिवरायांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन संस्थेच्या प्रगतीसाठी प्रामाणिकपणे व निष्ठेने काम करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली. प्रसाद वितरणानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## पान ६ वरुन...

### भारतीय बौद्ध महासभेच्या

गौरव केला आहे असे मत यावेळी शहराध्यक्ष हतागळे यांनी व्यक्त केले. महापुरूषांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेचे कार्य सुरू असल्याचे ही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे सुधाकर हातागळे (शहराध्यक्ष), प्रा.डॉ.भिमानंद गजभारे (सरचिटणीस), बालासाहेब चव्हाण (कोषाध्यक्ष), अर्जुन वाघमारे (उपाध्यक्ष, संरक्षण), भारत दासूद (कार्यालयीन सचिव), बाळू खांडके (सचिव, संस्कार), सुधाकर वाघमारे (सचिव, संरक्षण), कल्याण जोगदंड (सचिव, पर्यटन/प्रचार), निलेश शेवाळे (सचिव, संरक्षण), दिलीप वैद्य, (हिशोब तपासणीस), अविनाश घनघाव (सचिव, पर्यटन व प्रचार), निवृत्ती अण्णा कांबळे (ज्येष्ठ समता सैनिक), तसेच भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेतर्फे निमंत्रित समता सैनिक दल, मयूर धन्वे (अंबाजोगाई तालुका, संरक्षण सचिव) हे आवर्जून उपस्थित होते.

### आ.सोळंके, आ.धस व आ.पंडित

असणारे आ.प्रकाश दादा सोळंके यांनी दि.१९ गुरुवार रोजी व गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा जगताप कुटुंबीयांचे पूर्वीपासूनचे स्नेही असणारे आ.विजयसिंह राजे पंडित यांनी दि.२० शुक्रवार रोजी वडवणी याठिकाणी येत दुःखांकित जगताप कुटुंबीयांची भेट घेवून सांत्वन केले. त्याचप्रमाणे माजी मंत्री बदामराव पंडित, माजी आमदार सुनिल दादा धांडे, माजी आमदार जनार्दन तुपे, माजी आमदार केशवराव आंधळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रमेशराव आडसकर, छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मोहनदादा जगताप, जिल्हा परिषद सभापती जयसिंग भैय्या सोळंके, माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास आबा धस, ज्येष्ठ नेते नारायणराव डक, माजी जिल्हा परिषद सदस्य सौ.ज्योतीताई डक, ज्येष्ठ नेत्या सुशिलाताई मोराळे, नगराध्यक्ष सहाल चाऊस, नगराध्यक्ष बालासाहेब जाधव, नगराध्यक्ष रोहिदास गाडेकर, माजी नगराध्यक्ष अर्जून गायकवाड, माजी नगराध्यक्ष माधवराव निर्मळ, माजी नगराध्यक्ष शेषेराव फावडे, माजी नगराध्यक्ष राजाभाऊ अण्णा मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, भाजप नेते मनोज पाटील, अशोकराव हिंगे, रमेश चव्हाण, गणेश उगले, कैलास माने, युवा नेते रामराव गिते, जिल्हा परिषद सदस्य माऊली जरांगे, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भवर, जिल्हा परिषद सदस्य प्रकाश कवठेकर, कल्याण कुलकर्णी, गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, कृषी अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, कार्यालयीन अधीक्षक भूमी अभिलेख नेहरकर साहेब, सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे मॅडम, जिल्हा परिषद सभापती कल्याण आबुज, जिल्हा परिषद सदस्य औदुंबर सावंत, माजी सभापती नितीन दादा नाईकनवरे, सीए बी.बी.जाधव साहेब, बीड शहर प्रमुख संतोष जाधव, संजय लाटे, ओंकार कुलकर्णी, मुख्याधिकारी पोपट निगळ, निखिल बिक्कड, माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव सरवदे, ज्येष्ठ नेते अच्युतराव लाटे, नगरसेवक शरद यादव, नगरसेवक अमोल चव्हाण, गणेश तळेकर, भीमराव गायकवाड, गणेश भांडेकर, प्रा.अर्जून तनपुरे सर, प्रा.गोपाळ धांडे, उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे, माजी उपनगराध्यक्ष गफार भाई, नगरसेवक लक्ष्मण सिरसट, उपसरपंच बाळासाहेब नागटिळक, बालासाहेब मुंडे, अनिल माने यांच्यासह संपूर्ण बीड जिल्ह्यातील जगताप कुटुंबीयांशी स्नेहबंध असणारे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप आणि राष्ट्रवादीचे नेते भारत दादा जगताप यांसह दुःखांकित जगताप कुटुंबीयांची भेट घेवून सांत्वन केले. व या दुःखाच्या प्रसंगी आम्ही आपल्या सोबत आहोत अशी भावना व्यक्त करुन धीर दिला.

### माजलगाव : व्यंकटेश

(वय ४०) रा. नित्रुड तालुका माजलगाव येथील असल्याचे समजते. सदरील व्यक्तीने दि.१५ फेब्रुवारी रोजी लॉज मधील रुम बुक केला असल्याची माहिती आहे.या दरम्यान लॉज कर्मचाऱ्याला लॉज मध्ये सतत दिसणारी व्यक्ती कालपासून रूम बाहेर दिसली नाही. त्यामुळे संशय आल्याने दि २० फेब्रुवारी शुक्रवार रोजी रात्री याबाबतीत कर्मचाऱ्याने सदरील व्यक्ती बाबत पोलिसांना माहिती दिली.असे कळते.पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

### प्रा.डॉ.तानाजी आगळे

वरील निवडी बद्दल मा. जयदत्त अण्णा क्षीरसागर(माजी मंत्री), डॉ. भारतभूषण क्षीरसागर, मा. डॉ. दीपाताई क्षीरसागर , डॉ. योगेश दादा क्षीरसागर, डॉ. सारिका ताई क्षीरसागर, मा. आ. संदीप भैया क्षीरसागर, मा. आ. विजयसिंह पंडित, मा. माजी मंत्री मा. प्रा. सुरेश नवले, माजी मंत्री मा. सय्यद सलीम साहेब , मा. शाहेद पटेल, मा. सुनील क्षीरसागर, मा. दिलीप खिस्ती, प्राचार्य डॉ. बळीराम राख, डॉ. अभय क्षीरसागर, उपप्रचार्य प्रा. डॉ. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. श्री. अनिल जोगदंड, श्री. बिबीशन पाटील, श्री. पवन वाटोडे (धाराशिव), श्री. गंगाधर मोदाळे(संभाजीनगर), मा. अरविंद विद्यागर (जिल्हा क्रीडा अधिकारी) बीड, योगेश करांडे, मा. तानाजी आबा कदम (अध्यक्ष जिल्हा दूध संघ), राष्ट्रीय खेळाडू श्री. तानाजी मेटे, श्री. विष्णू भैय्या वाघमारे, नगरसेवक श्री. शुभम धूत, श्री. नितीन साखरे, खो-खो खेळाडू श्रीमती गीतांजली देशपांडे/कुलकर्णी (अंबाजोगाई), राणी शिंदे/हंबर्डे , प्रा. चित्राताई आगळे (मुली प्रशिक्षिका), यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### डोंगराच्या कुशीत वसलेल्या

अवघ्या ३६ तासात ड. मयूर आंधळेंनी केले नियोजन

सरपंच ड. मयूर आंधळे यांनी केवळ ३६ तासांच्या अल्प कालावधीत आपल्या सहकाऱ्यांना व ग्रामस्थांना एकत्रित केले, जबाबदाऱ्यांचे वाटप, वेळेचे व्यवस्थापन आणि कार्यक्रमाच्या तयारीदरम्यान सजावट, पाहुण्यांचे स्वागत, बैठक व्यवस्था, इतर आवश्यक बाबींची काटेकोर अंमलबजावणी करून त्यांनी संपूर्ण आयोजन सुरळीत पार पाडले. ग्रामस्थांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमाला भव्य स्वरूप प्राप्त करून दिले. यावेळी सिने अभिनेत्री रिंकू राजगुरू यांनी मयूर आंधळे यांच्या कार्याचे कौतुक केले. अल्पावधीत इतके उत्कृष्ट नियोजन करणे ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे, असे मत व्यक्त करत त्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल मान्यवरांच्या शुभहस्ते सरपंच ड. मयूर आंधळे यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला.

### १२१ रक्तदात्यांनी रक्तदान

असलेले नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्याबाहेरील व शेजारील जिल्ह्यांतील मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहून शुभेच्छा देण्यासाठी आष्टीत दाखल झाला होता. सामाजिक संदेश या उपक्रमातून पुढील महत्त्वाचे संदेश देण्यात आले: रक्तदान म्हणजे जीवनदान क्रीडा स्पर्धांमुळे युवकांमध्ये सकारात्मक ऊर्जा पुस्तक भेट ज्ञानाची खरी संपत्ती वाढदिवस समाजासाठी समर्पित करण्याची प्रेरणा राधेश्याम भैय्या धस यांच्या वाढदिवसानिमित्त राबवलेल्या या उपक्रमांनी समाजात आदर्श निर्माण केला असून, भविष्यातही अशा लोकहितकारी कार्यांची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## इकरा पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

येथील इक़रा पब्लिक स्कूल मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात व आनंदात पार पडले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांमध्ये मिळवलेल्या यशाबद्दल प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले तसेच शिक्षकांना बेस्ट टीचर प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

शाळेचे अध्यक्ष शेख अब्दुल गनी यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक करून त्यांचे मनोबल वाढविले. कार्यक्रमास माजलगाव येथील नगरसेवक उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

उपस्थित मान्यवरांमध्ये राज सय्यद अहमद नूर, जुनेद खान, कुरेशी महेमूद, शेख अब्दुल मतीन यांचा समावेश होता. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दिनकर मस्के (मस्के हॉस्पिटल), शेख खलील (अधिवक्ता), शेख तय्यब (संयुक्त सचिव, आईटा महाराष्ट्र), नझीर शाह (व्यवसायिक, पाथरूड), पठाण अन्सार खान (रिअल इस्टेट व्यावसायिक), मोमीन झिया (नोव्हेल्टी क्लॉथ शॉप) उपस्थित





होते.

या प्रसंगी शेख तय्यब सर यांनी प्रेरणादायी भाषण करून विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे मनोबल उंचावले. कार्यक्रमादरम्यान शाळेचे मुख्याध्यापक शेख तौसीफ रफीक यांनी शाळेमध्ये वर्षभर राबविण्यात आलेल्या विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांची माहिती उपस्थितांसमोर सादर केली. त्यांनी शाळेच्या प्रगतीविषयी तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतल्या जाणाऱ्या विविध ॲक्टिव्हिटीज विषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी हम्द, नात, नज्म नाटक व गीतांवर सुंदर सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमास शाळेचे अध्यक्ष शेख अब्दुल गनी, मुख्याध्यापक शेख तौसीफ रफीक, सचिव शेख अतीक रफीक, आयोजक शेख तौफिक रफीक तसेच सर्व शिक्षक, कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख परवीन मॅडम, मोमीन नोमान सर, सादिया मॅडम, सुहाना मॅडम, अदिबा मॅडम व शाळेच्या शिपाई तांबोळी अंजुम बाई यांनी विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला.

## बीडसांगवीत शिवमहोत्सव उत्साहात साजरा; सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**आष्टी । प्रतिनिधी**

**तालुक्यातील ग्रामीण भागातील गणगेवाडी गुडेवाडी कणसेवाडी बीड सांगवी अठरा पगड जातींनी सर्व सामान्य माणसांनी शिवभक्तांनी आयोजित करण्यात आला होता या ठिकाणी श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात मध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज आयोजन करण्यात आले होते.**

आमदार श्री सुरेश आण्णा धस यांचे चिरंजीव जयदत्त भैय्या धस यांनी अखंड महाराष्ट्राचे दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आहे यावेळी उपस्थित श्री क्षेत्र महादेव दरा संस्थान महंत ह.भ.प कल्याण कोल्हे महाराज.ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज भवर.ह.भ प.शरद लेकरवाळे महाराज.ह.भ.प.पवार सर .हे.भ.प.जालीधर नरवडे महाराज.ह.भ.प बाबासाहेब नरवडे महाराज.ह.भ.प श्रीहरी पुरी महाराज.

बीड सांगवी प्रथम नागरिक सौ शितल नंदकिशोर करांडे. उपसरपंच सौ छाया साळवे सेवा सेवा सोसायटी चेअरमन सुभाष तात्या गणगे युवा नेते नंदकिशोर करांडे.माजी सरपंच बबनराव करांडे.आमदार श्री सुरेश आण्णा धस यांचे स्वीय सहायक विकास तात्या साळवे. माजी उपसरपंच रंजित ढोबळे माजी उपसरपंच संदिप करांडे.माजी उपसरपंच सोमनाथ घुले.माजी उपसरपंच सदाशिव गणगे.माजी सरपंच माणिक नरवडे.बाबासाहेब शिंदे.जालीधर देवकर.विजय डुकरे समाजसेवक.कलाण मोहरकर.माऊली चव्हाण.विठल जाधव.सतोष घुले रफिक शेख रियाज शेख मारुती करडुळे लहु करडुळे पोपट करडुळे कृष्णा पाणतावणे गोकुळ नरवडे. संतोष नरवडे.ललेश नरवडे. भाऊसाहेब नरवडे.लहु करांडे महादेव करांडे.महादेव घुले.सजय मोरे सुदामा मोरे.कातीलाल दिवटे. लक्ष्मण दिवटे.गोरग ढोबळे.घनशाम नरवडे तुषार काळे.अनिल सोनवणे.दिपक कासवा रितेश पानतावणे.विकास पानतावणे.पपु ढोबळे.सजय डुकरे.अमोल करांडे फिटर आरेफ सय्यद संतोष गोरे.सौ अलका विकास साळवे.राणी करांडे.शोभा करांडे सुदामती करांडे.मनिषा गोरे जयक्षी जाधव.सुरेखा पंडित.अशिनी पाडुळे माया वाहळ अर्चना करांडे मनिषा माळी सुनिता दळवी सुनिता जाधव.मनिषा देवकर .छाया पानतावणे..नेताजी सुभाष चंद्र बोस विद्यालय शिक्षक स्टाफ. जिल्हा परिषद शाळा स्टाफ. इंग्लिश स्कूल स्टाफ.आदि उपस्थित होते नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालय व जिल्हा परिषद शाळा इंग्लिश स्कूल यांचे विद्यार्थिनी सहभाग घेतला रात्री ह.भ.प धनाजी चव्हाण महाराज सातारकर यांचे हरी किर्तन झाले आहे यावेळी सुत्रसंचलन वाडेकर सर यांनी केले आणि आभार प्रदर्शन गोकुळ नरवडे यांनी केले आहे

## विविध विकासकामांबाबत तहसील कार्यालयात आ.प्रकाश सोळंके यांनी घेतली आढावा बैठक

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव,धारुर व वडवणी तालुक्यातील मतदारसंघातील विविध विषयाच्या विकास कामासंदर्भात दि २० फेब्रुवारी शुक्रवार रोजी येथील तहसील कार्यालयात आ.प्रकाश सोळंके यांनी आढावा घेतली.

या बैठकीमध्ये मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना अंतर्गत सुरू व प्रस्तावित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच माजलगाव शहरातील आठवडी बाजारासाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून देणे, नगरपरिषद पाणीपुरवठा योजनेअंतर्गत एस.टी.पी. प्रकल्पासाठी आवश्यक जागेची उपलब्धता,घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना मोफत वाळू पुरवठा, ग्रामीण रस्त्यांचे सीमांकन व अतिक्रमण विषयक कार्यवाही, वडवणी येथील बसस्थानकासाठी अत्यावश्यक जागा उपलब्ध करून देणे तसेच माजलगाव येथे अल्पसंख्याक समाजातील मुला-मुलींसाठी वसतिगृह उभारणी या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.मुख्यमंत्री बळीराजा शेत



पाणंद रस्ते योजना अंतर्गत प्राधान्याने मागणी असणाऱ्या गावांची यादी तयार करून क्लस्टर सादर करण्याच्या सूचना दिल्या तसेच माजलगाव शहरातील आठवडी बाजाराच्या जागेच्या अनुषंगाने जागेसाठीचा प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचित केले.शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी नवीन पाण्याच्या टाकीसाठी आणि सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पासाठी जागेची निश्चिती करून परिपूर्ण प्रस्ताव वेळेचा विलंब न करता तयार करून पुढील कार्यवाही साठी पाठवावे.घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना मोफत वाळू देण्याच्या दृष्टीने लिलाव झालेल्या वाळू घाटांवरून मोफत वाळू देण्यास सुरुवात करून लाभार्थ्यांना दिलासा द्यावा असे निर्देश दिले.ग्रामीण रस्त्यांचे सीमांकन व अतिक्रमण याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.या रस्त्यांबाबत आदेश पारित केल्यानंतर देखील रस्ते खुले केले नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या,या अनुषंगाने प्रलंबित प्रकरणातील शेतकऱ्यांना तातडीने रस्ते खुले करून देण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना आ.प्रकाश सोळंके यांनी संबंधित अधिकाऱ्यांना करण्यात आल्या.संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्याच्या व आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही गतीमान करण्याच्या सूचना दिल्या. मतदारसंघातील विकासकामांना अपेक्षित वेग देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश यावेळी आ.प्रकाश सोळंके यांनी दिले.या आढावा बैठकीस उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, माजलगावचे तहसीलदार संतोष रुईकर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## विद्युत कर्मचारी सहकारी पतसंस्थेत शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील विद्युत कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित पाटोदा येथे१९ फेब्रुवारी रोजी विद्युत कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सुनील वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या वेळी श्री मुळे साहेब व श्री रमेश चौरे साहेब यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी विधूत कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या चे चेअरमन सुनील वाघमारे साहेब प्रभू

जाधवर साहेब श्री मुळे साहेब अकाउंटंट असिस्टंट श्री सतीश गोरे साहेब उच्चस्थर लिपिक श्री शाहजी नाईकवाडे प्रधान तंत्रज्ञ श्री रमेश चौरे साहेब श्री वैभव नाईकनवरे श्री घुमाळ साहेब श्री सय्यद सद्दाम श्री अनपट साहेब श्री वीर साहेब श्री रमेश वाघे साहेब यांच्या सह सर्व संचालक मंडळ व संस्थेचे सभासद हजर होते . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्यवस्थापक विष्णू नाईकवाडे व संगणक ऑपरेटर गुलाम माजेद शेख यांनी परिश्रम घेतले तर आभार सचिव जाधवर यांनी मानले यावेळी सर्व संचालक सभासद उपस्थित होते.

cmyk



# पीएम किसानच्या २२ व्या हप्त्यापासून हे शेतकरी राहणार वंचित

पुणे । प्रतिनिधी

**देशातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या अजूनही शेती करुन आपला उदरनिर्वाह करते. यापैकी बरेच शेतकरी शेतीतून जास्त कमाई करु शकत नाहीत. अशा शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी केंद्र सरकार अनेक योजना राबवत आहे, त्यापैकी सर्वात मोठी योजना म्हणजे प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी तीन हप्त्यांमध्ये ६००० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. मागील वेळच्या २१ व्या हप्त्याप्रमाणे यावेळीही लाखो शेतकऱ्यांना अडचणीचा सामना करावा लागू शकतो. यापूर्वी अनेक शेतकऱ्यांचे निधी अडकले होते. यावेळीही अनेक शेतकऱ्यांना २००० रुपयांचा पुढील हप्ता मिळणार नाही.**




ज्यांच्याकडे जमीन नाही त्यांना लाभ मिळणार नाही या योजनेचा सर्वात महत्त्वाचा नियम जमिनीशी संबंधित आहे. लाभ फक्त अशा शेतकऱ्यांनाच मिळतो ज्यांच्या शेतजमीन त्यांच्या नावावर नोंदणीकृत आहे. जर एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीची जमीन शेअर पीक किंवा भाडेपट्ट्यावर लागवड करत असेल, परंतु जमीन त्यांच्या नावावर नसेल, तर त्यांना या योजनेसाठी पात्र मानले जाणार नाही. जमिनीच्या नोंदी राज्य सरकारच्या डेटाशी जुळवल्या जातात. जर माहिती अपूर्ण किंवा चुकीची असेल, तर हप्ता रोखला जाऊ शकतो. अनेक राज्यांमध्ये नवीन अर्जदारांसाठी शेतकरी ओळखपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. वैध जमिनीच्या नोंदी आणि आवश्यक ओळखपत्राशिवाय, २२ वा हप्ता मिळणे कठीण होऊ शकते. सरकारी आदेशांनुसार, ई-केवायसी पूर्ण करणे अनिवार्य आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी पूर्ण केले नाही त्यांना त्यांच्या हप्त्यात विलंब होऊ शकतो. ही प्रक्रिया ऑनलाइन आणि सोपी आहे. शेतकरी अधिकृत पोर्टल किंवा मोबाइल ॲपद्वारे ओटीपी-आधारित ई-केवायसी करू शकतात. काही प्रकरणांमध्ये बायोमेट्रिक पडताळणी देखील आवश्यक असू शकते. जर तुमच्या आधारमध्ये त्रुटी असेल किंवा तुमचा मोबाइल नंबर अपडेट केलेला नसेल, तर यामुळे देखील समस्या उद्भवू शकतात. म्हणून, २२ वा हप्ता भरण्यापूर्वी सर्व माहिती तपासा. अन्यथा, अगदी लहान चुकीमुळे देखील २००० रुपये विलंब होऊ शकतो.

### आधार-लिंक्ड बँक खाते आवश्यक

हप्ता थेट बँक खात्यात हस्तांतरित केला जातो. म्हणून, बँक खाते आधारशी लिंक केलेले असणे आवश्यक आहे. जर खाते आधारशी लिंक केलेले नसेल किंवा मॅपिंग अपडेट केलेले नसेल, तर पेमेंट फेल होऊ शकते. अनेक शेतकऱ्यांचे मागील हप्ते याच कारणामुळे विलंबित झाले होते. नाव, जन्मतारीख किंवा बँक तपशीलांमध्ये जुळत नसल्यामुळे देखील समस्या उद्भवू शकतात. २२ व्या हप्त्याची तारीख अद्याप अधिकृतपणे जाहीर केलेली नाही. तथापि, मीडिया रिपोर्ट्सनुसार, होळीपूर्वी निधी हस्तांतरित केला जाईल. शेतकऱ्यांनी आता सर्व आवश्यक औपचारिकता पूर्ण करणे चांगले.

# जिरा शेतीतून मिळतो भरघोस नफा



**शेतीत प्रगतीच्या दिशेने झपाट्याने वाटचाल करायची असेल, तर शेतकऱ्यांकडे योग्य माहिती असणे आवश्यक आहे, जेणेकरून ते त्यांचा नफा-तोटा ओळखू शकतील. वास्तविक, अनेक शेतकरी जे अजूनही पारंपरिक शेतीवर अवलंबून आहेत, परंतु त्यांनी आपली शेती पद्धत बदलून विविध प्रकारची पिके घेतली तर त्यांना मोठा नफा मिळू शकतो. जिरा हे असे पीक आहे जे प्रत्येक घराच्या स्वयंपाकघरात आढळते. त्याचा वापर मसाला म्हणून केला जातो, त्यामुळे त्याला देशभरात मोठी मागणी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळतो. आम्ही तुम्हाला सांगतो की जिऱ्याची लागवड इतर सर्व प्रकारच्या शेतीपेक्षा जास्त फायदेशीर आहे, परंतु जिऱ्याचा शेतीमध्ये जर आपल्याला हवामान, बी-बियाणे, खते आणि सिंचन योग्यरित्या माहित नसेल तर आपल्याला देखील त्रास सहन करावा लागतो.**

**हवामान** : ओलसर, दमट आणि अतिवृष्टीच्या हवामानात जिरे पीक चांगले टिकत नाही. हे उपोष्णकटिबंधीय उष्णता आणि आर्द्रतेसह मध्यम कोरड्या आणि थंड हवामानात चांगले वाढते.

**जमीन** : जिऱ्याचा शेतीसाठी सेंद्रिय पदार्थांचा चांगला निचरा होणारी माती लागते. जर तुम्ही व्यावसायिक शेतीची व्यवस्था करत असाल, तर अशा क्षेत्राची निवड करावी ज्यामध्ये गेल्या ३ ते ४ वर्षात जिऱ्याची लागवड झालेली नाही.

**पेरणी** : नोव्हेंबर आणि डिसेंबरच्या हिवाळ्यातील महिने मध्यम दिवस आणि थंड हवामान करतात. जे जिरे पेरणीसाठी सर्वोत्तम वेळ आहे. साधारणपणे १२ ते १६ किलो जिऱ्याची रोपे प्रति हेक्टर पुरेशी असतात.

**जिरे लागवडीमध्ये तण नियंत्रण** :

जिरे लागवडीमध्ये तण हा महत्त्वाचा मुद्दा आहे. जिऱ्याच्या लागवडीसाठी साधारणतः १ महिना आणि २ महिन्यांनी जीरा लागवड केल्यानंतर खुरपणी करावी लागते. यासाठी तुम्हाला ०.५ ते १.० किलो/हेक्टर दराने प्री-इमर्जंट टर्ब्युट्रिन किंवा ऑक्सकेडियाझोन किंवा प्री-प्लांट फ्लुक्लोरालीन किंवा प्री-इमर्जंट पेनिमेथालिन १.० किलो/हेक्टर दराने वापरावे लागेल.

**सिंचन** : बियाणे पेरल्यानंतर अनेकदा हलके पाणी द्यावे लागते आणि दुसरे पाणी ७ ते १० दिवसांनी द्यावे. जमिनीचा प्रकार व हवामानानुसार पुढील सिंचन करावे.

**जिरे काढणी व उत्पन्न** : कापणीपूर्वी, शेत साफ केले जाते आणि कोमेजलेली झाडे काढली जातात. विळ्याने जिरे कापून काढणी पूर्ण केली जाते. उन्हात सुकविण्यासाठी झाडे स्वच्छ जमिनीवर ठेवावीत. उन्हात वाळल्यानंतर बिया काठ्यांनी हलका मारून वेगळ्या केल्या जातात.

# जनावरांच्या शेणातून होईल पैशांचा पाऊस

## शेतीसोबत 'हे' उद्योग सुरू करा

आजच्या बदलत्या काळात शेतीसोबत पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी गायी-म्हशींचे शेण हे केवळ कचरा न राहता एक महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन बनत आहे. पूर्वी शेणाचा वापर फक्त सेंद्रिय खतापुरताच मर्यादित होता. मात्र आता पर्यावरणपूरक आणि नैसर्गिक उत्पादनांची मागणी वाढल्यामुळे, शेणापासून तयार होणाऱ्या विविध वस्तूंना शहरांमध्येही मोठी बाजारपेठ मिळू लागली आहे. योग्य प्रक्रिया, थोडी गुंतवणूक आणि कल्पकतेच्या जोरावर शेतकरी शेणावर आधारित उद्योगातून चांगला नफा मिळवू शकतात.



**शेणावर आधारित उद्योग कोणते?**

१) शेणापासून बनवलेल्या कुंड्या बागकामासाठी वापरल्या जाणाऱ्या सिमेंट किंवा प्लास्टिकच्या कुंड्या पर्यावरणाला हानीकारक ठरतात. त्याच्या तुलनेत शेणापासून बनवलेल्या कुंड्या पूर्णपणे जैवविघटनशील असतात. या कुंड्यांमध्ये रोपांची वाढ चांगली होते. कुंडी खराब झाल्यावर ती थेट कंपोस्टमध्ये टाकता येते, त्यामुळे कचरा कमी होतो आणि उत्तम खतही मिळते. २) शेणाच्या गोळ्या (उपळे)- धार्मिक विधी, हवन-पूजा आणि पारंपरिक कार्यक्रमांमध्ये शेणाच्या गोळ्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. या गोळ्या जळताना ३ ते ४ तास टिकतात आणि वातावरण शुद्ध करण्यास मदत करतात. जळाल्यानंतर उरलेली राख झाडांसाठी उपयुक्त ठरते. दसरा, दिवाळी यांसारख्या सणांमध्ये यांची मागणी वाढते, त्यामुळे हा हंगामी पण फायदेशीर व्यवसाय ठरतो. ३) सेंद्रिय अगरबत्ती आणि डास प्रतिबंधक धूप बाजारातील रासायनिक अगरबत्त्यांमुळे आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. याला पर्याय म्हणून गायीच्या शेणापासून बनवलेल्या सेंद्रिय अगरबत्त्या आणि डास प्रतिबंधक धूप लोकप्रिय होत आहेत. यामध्ये नैसर्गिक सुगंधी द्रव्यांचा वापर केला जातो. सेंद्रिय उत्पादनांची वाढती मागणी पाहता, हा उद्योग शेतकऱ्यांना चांगला नफा देऊ शकतो. ४) पर्यावरणपूरक राख्या स्वदेशी आणि नैसर्गिक वस्तूंना वाढती मागणी असल्याने, शेणापासून बनवलेल्या राख्यांनाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. या राख्या सुगंधी, आकर्षक आणि पूर्णपणे पर्यावरणस्नेही असतात. रक्षाबंधनाच्या काळात या राख्यांची विक्री करून शेतकरी अतिरिक्त उत्पन्न मिळवू शकतात.

५) शेणाचे कृत्रिम लाकूड वनतोड वाढत असल्याने पर्यावरणावर मोठा ताण येत आहे. अशा परिस्थितीत शेणापासून तयार केलेले कृत्रिम लाकूड हा उत्तम पर्याय ठरत आहे. याचा वापर हवन, अंत्यसंस्कार तसेच काही ठिकाणी फर्निचरसाठीही केला जातो. यंत्राच्या साहाय्याने तयार केलेले हे लाकूड वाळवून बाजारात विकले जाते आणि त्यातून चांगला नफा मिळतो.

६) मूर्ती आणि सेंद्रिय खत सिमेंटच्या मूर्तींमुळे जलप्रदूषण वाढते. शेणापासून बनवलेल्या मूर्ती पाण्यात सहज विरघळतात आणि पर्यावरणाला हानी पोहोचवत नाहीत. तसेच शेण आणि गोमूत्रापासून सेंद्रिय खत, जीवामृत आणि जैवखते तयार करून नैसर्गिक शेतीला चालना देता येते.

# जनावराने प्लॅस्टिकचे सेवन केल्यास होतो गंभीर परिणाम

**प्लास्टिकमुळे माणसांचे जीवन सुखकर झाले असले तरी त्याचा अतिवापरामुळे पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहे. प्लॅस्टिकचे विघटन लवकर होत नसल्याने त्याच्या कचऱ्यांचे ढीग सर्वत्रसर पसरलेले दिसतात. विशेष म्हणजे खाद्य पदार्थांसाठीही प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर केला जातो. तसेच टाकाऊ खाद्य टाकण्यासाठीही प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर होतो. यामुळे खाद्याकडे आकर्षित होऊन विविध प्राण्यांच्या पोटामध्ये प्लॅस्टिक जात आहे. मोकाट फिरणाऱ्या जनावरांसाठी तर हा प्लॅस्टिकचा कचरा यमदूत ठरत आहे. त्यांच्या शरीर आणि आरोग्यावर त्याचे विपरीत परिणाम होत आहे.**

**पचनसंस्थेवर होणारे दुष्परिणाम** :

जनावरे, विशेषतः गायी, बकऱ्या आणि इतर रवंथ करणाऱ्या प्राण्यांना अन्न खाताना प्लॅस्टिक आणि इतर कचरा सहजपणे खाल्ला जातो. जनावरांच्या पोटातील पचनसंस्था मानवी पचनसंस्थेपेक्षा वेगळी असते. त्यांच्या पोटात अनेक कप्पे असतात. गायी आणि म्हशींसारख्या जनावरांमध्ये, खाल्लेले अन्न पोटातील पहिल्या कप्प्यात जाते. तिथे ते अर्धवट पचते. पुन्हा रवंथ करण्यासाठी तोंडात येते. आहारामध्ये प्लॅस्टिक येते, त्यावेळी ते त्यांच्या पोटातील या कप्प्यांमध्ये साठून राहते.


**प्लॅस्टिकचा गुंता आणि अडथळे** :

पोटातील प्लॅस्टिकचे तुकडे एकमेकांत अडकून एक मोठा गोळा तयार होतो. त्याला प्लॅस्टिक बॉल किंवा प्लॅस्टिक गुंता म्हणतात. हा गोळा पचनमार्गात अडथळे निर्माण करतो. त्यामुळे अन्न पुढे सरकत नाही आणि जनावर काहीही खाऊ शकत नाही. प्लॅस्टिकमुळे पोटातील अन्न पचवणारे सूक्ष्मजीव बाधित होतात. यामुळे जनावरांना त्यांच्या खाद्यातून आवश्यक पोषकतत्त्वे मिळत नाहीत. ते कुपोषित होतात. प्लास्टिकच्या तीक्ष्ण कडांमुळे जनावरांच्या आतड्यांना आणि पोटाला आतून जखमा होतात, त्यामुळे अंतर्गत रक्तस्राव होतो. यामुळे जनावर अशक्त होते आणि काहीवेळा त्याचा मृत्यूही होतो.

**आरोग्यविषयक गंभीर समस्या** :

कुपोषण आणि अशक्तपणा - प्लॅस्टिकमुळे जनावरांची भूक मंदावते. प्लॅस्टिक पोटात जागा व्यापल्याने त्यांना पोट भरल्यासारखे वाटते, पण प्रत्यक्षात त्यांना कोणतेही पोषण मिळत नाही. यामुळे जनावर हळूहळू कुपोषित होते, त्याचे वजन घटते आणि ते अशक्त बनते.

विषबाधा - प्लॅस्टिकमध्ये अनेक



विषारी रसायने असतात. ही रसायने शरीरात शोषली जातात, त्यातून विषबाधा होते. यामुळे यकृत, मूत्रपिंड आणि मज्जासंस्थेवर गंभीर परिणाम होतात.

प्रजननक्षमतेवर परिणाम - काही विषारी घटक जनावरांच्या हार्मोन्सच्या कार्यामध्ये अडथळे आणतात. यामुळे प्रजननक्षमता कमी होते. गाभण जनावरांवर याचा अधिक गंभीर परिणाम होतो.

प्लॅस्टिकचे अंश :: एखादी गाय किंवा म्हैस प्लॅस्टिक खाते, तेव्हा त्या प्लॅस्टिकमधील विषारी घटक तिच्या शरीरात शोषले जातात. हे घटक दुधात किंवा मांसात मिसळले जातात. त्यांच्या शरीरात तयार होणाऱ्या दुधाच्या माध्यमातून माणसांच्या शरीरात हे विषारी घटक प्रवेश करतात. त्यातून दीर्घकाळासाठी गंभीर आजार होऊ शकतात.

माती आणि पाणी प्रदूषण : जनावरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या शरीरात असलेले प्लॅस्टिक आणि त्याचे अंश मातीत मिसळतात. यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. तसेच, पावसामुळे हे प्लॅस्टिकचे कण नदी- नाल्यांमध्ये वाहून जातात, ज्यामुळे जलप्रदूषण होते.

प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन : प्लॅस्टिक कचरा योग्य प्रकारे गोळा करणे आणि त्याची विल्हेवाट लावणे अत्यंत आवश्यक आहे. घरातील कचरा वेगळा करून देणे आणि प्लॅस्टिकचा वापर कमी करणे हे महत्त्वाचे आहे.

जागृती मोहीम : लोकांना प्लॅस्टिकचे दुष्परिणाम समजावून सांगणे आवश्यक आहे. विशेषतः ग्रामीण भागात जनावरांना प्लॅस्टिक खाण्यापासून कसे वाचवायचे याबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे.

पर्यायी वस्तूंचा वापर : प्लॅस्टिक पिशव्या आणि वस्तूंऐवजी कापडी पिशव्या, कागदी पिशव्या आणि पुन्हा वापरता येणाऱ्या वस्तूंचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

प्लॅस्टिकचा वापर ही एक जागतिक समस्या आहे. जनावरांच्या प्लॅस्टिक सेवनामुळे होणारे परिणाम केवळ त्यांच्यापुरतेच मर्यादित नाहीत, तर ते मानवाच्या आरोग्यावर आणि पर्यावरणावरही गंभीर परिणाम करतात. ही समस्या दूर करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने आपल्या जबाबदारीचे भान राखणे आवश्यक आहे. प्लॅस्टिकमुक्त समाजाची निर्मिती करूनच आपण आपल्या जनावरांचे, पर्यावरणाचे आणि स्वतःचे संरक्षण करू शकतो.

# ऱ्होड आयलँड रेड जातीच्या कोंबड्या पाळा; अंडी-चिकन व्यवसायात दुप्पट नफा!

शेतकरी अधिक नफा मिळविण्यासाठी शेतीसोबतच इतर व्यवसाय करत असतात. जेणेकरून त्यांना शेतीतून दुहेरी आर्थिक उत्पन्न मिळवण्याची अपेक्षा असते. आजकाल ग्रामीण भागात शेतकरी कुक्कुटपालन व्यवसायाचा अवलंब करत आहेत. विशेष म्हणजे चांगल्या जातीच्या कोंबड्यांचे संगोपन करून, शेतकरी वर्षानुवर्षे चांगले पैसे कमवू शकतात. त्यामुळे आता तुम्हीही कुक्कुटपालन व्यवसायकरायचा असेल तर 'ऱ्होड आयलँड रेड' कोंबडी तुमच्यासाठी एक चांगला पर्याय ठरू शकते.

माहिती असणे आवश्यक :

अनेक शेतकऱ्यांना पोल्ट्री व्यवसायामध्ये उतरून अधिकचा नफा मिळवण्याची अपेक्षा असते. मात्र, त्यासाठीचे भांडवल, सर्व खर्च, उत्पन्न आणि चांगल्या जातीची कोंबड्यांची माहिती नसल्याने त्यांना त्यातून नफा मिळत नाही. जर तुम्हालाही चांगल्या जातीच्या कोंबड्यांचे संगोपन करून फायदा मिळवायचा असेल. तर तुम्ही नक्कीच 'ऱ्होड आयलँड रेड' जातीच्या कोंबड्या पाळू शकतात.

**वर्षाला २९० ते ३०० अंडी** :



'ऱ्होड आयलँड रेड' ही कोंबडी ऑस्ट्रेलियन जातीची आहे. ज्याची अंडी उत्पादन क्षमता प्रति वर्ष २९० ते ३०० अंडी आहे. याउलट देशी जातीची कोंबडी वर्षाला १०० ते १५० अंडी देते. आरआयआर ही अंडी उत्पादनासाठी सर्वोत्तम जात मानली जाते. या जातीची कोंबडीची पिल्ले अंडी घालण्यासाठी फार लवकर विकसित होतात. या जातीची कोंबडी तुम्ही घराच्या मागेही सहज पाळू शकतात. या जातीच्या कोंबडीची रोगप्रतिकारक शक्ती देखील चांगली असते. ज्यामध्ये आजारी पडण्याची शक्यता खूपच कमी असते.

बाजारपेठेत सर्वाधिक मागणी :

ऱ्होड आयलँड रेड कोंबडी एका वर्षात सुमारे ३०० अंडी देते. ज्याची किंमत भारतीय बाजारपेठेत खूप जास्त आहे. तसे पाहिले तर या जातीच्या कोंबडीचे अंडी १० ते १२ रुपयांना प्रति मग विकले जाते. दुसरीकडे, इतर जातींच्या कोंबडीच्या अंड्याची किंमत सात ते आठ रुपयांपर्यंत आहे. त्याच वेळी त्याच्या मांसाची किंमत देखील बाजारात सर्वाधिक आहे. अशा परिस्थितीत तुम्ही आरआयआर जातीच्या कोंबडीचे पालन करून चांगला नफा मिळवू शकतात.




## जागतिक दिवस
सेंट लुशियाचा स्वातंत्र्यदिन
विश्व विचार दिवस

### महत्वाच्या घटना

१८१९: स्पेनने फ्लोरिडा हा प्रांत अमेरिकेला ५० लाख डॉलरच्या मोबदल्यात विकला.
१८२१: आजच्या दिवशी स्पेन ने फ्लोरिडा हे शहर अमेरिकेला ५० लाख डॉलर ला विकले.
१८५७: रत्नागिरीत 'पतित पावन' मंदिरांची स्थापना झाली.
१९३१: स्वा. सावरकर व भागोजी शेठ यांच्या पुढाकाराने अस्पृश्यादी सर्व जातींना मुक्त प्रवेश असणाऱ्या पतितपावन मंदिर व देवालयाची स्थापना
१९४२: दुसरे महायुद्ध फिलिपाईन्समध्ये जपानी सैन्याकडुन पराभव अटळ दिसत असल्यामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष एफ. डी. रूझवेल्ट यांनी जनरल डग्लस मॅकआर्थरला माघार घ्यायचा हुकुम दिला.
१९४८: झेकोस्लोव्हाकियामध्ये कम्युनिस्ट क्रांती.
१९५४: पहिली कापड गिरणी मुंबईत सुरु
१९७४: पाकिस्तान ने आजच्या दिवशी बांगलादेश ला मान्यता प्रदान केली.
१९७८: श्री. यशवंत विष्णू चंद्रचूड यांनी भारताचे १६ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला. या पदावर सर्वात प्रदीर्घ काळ (२६९६ दिवस) त्यांनी काम केले.
१९७९: 'सेंट लुशिया' ला (ब्रिटनपासून) स्वातंत्र्य मिळाले.
१९८०: आजच्या दिवशी अफगानिस्तान ने मार्शल लॉ ची घोषणा केली.
१९९८: जपान च्या नगानो शहरात हिवाळी ऑलिम्पिक चा समारोह पार पडला.
२००६: आजच्या दिवशी जपान ने भारतातून आयात होणाऱ्या पोल्ट्री पदार्थांवर बंधी घातली होती

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७३२: जॉर्ज वॉशिंग्टन अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १४ डिसेंबर १७९९)
१८३६: महामहोपाध्याय पण्डित महेशचंद्र 'न्यायरत्न' भट्टाचार्य (मृत्यू: १२ एप्रिल १९०६)
१८५६: आर्या समाजाचे संन्यासी म्हणून ओळखले जाणारे स्वामी श्रद्धानंद यांचा जन्म.
१८५७: लॉर्ड बेडन पॉवेल बालवीर चळवळीचे प्रणेते (मृत्यू: ८ जानेवारी १९४१)
१८५७: हेन्रिच हर्ट्झ जर्मन भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १ जानेवारी १८९४)
१९०२: फ्रिट्झ स्ट्रासमान जर्मन भौतिकशात्रज्ञ (मृत्यू: २२ एप्रिल १९८०)
१९२०: इफ्तिखार चरित्र अभिनेता (मृत्यू: ४ मार्च १९९५)
१९२०: भारतीय चित्रपट अभिनेते कमल कपूर यांचा जन्म.
१९२२: व्ही. जी. जोग व्हायोलिनवादक (मृत्यू: ३१ जानेवारी २००४)
१९२२: आजच्या दिवशी पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध चित्रकार एस. एच. रज़ा यांचा जन्म.
१९६४: मॉर्टल कोमबॅट व्हिडिओ गेमचे निर्माते एड बून यांचा जन्म.
१९६४: हिंदी चित्रपट दिग्दर्शक सूरज बड़जात्या यांचा जन्म.
१९७२: महाराष्ट्राचे एन्काऊंटर स्पेशलीस्ट सचिन वाझे जन्म.
१९७५: अमेरिकन अभिनेत्री, दिग्दर्शक, निर्माता ड्रिव बॅरीमोर यांचा जन्म
१९९४: प्रसिद्ध मराठी चित्रपट अभिनेत्री केतकी माटेगावकार यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५६: ला मुघल सम्राट नसीरुद्दीन हुमायूँ चे निधन.
१८२७: चार्ल्स विल्सन पील अमेरिकन चित्रकार, निसर्गवैज्ञानिक व सैनिक (जन्म: १५ एप्रिल १७४१)
१९२५: सर थॉमस क्लिफोर्ड ऑलबट ज्वरमापीचा शोध लावणारे इंग्लिश डॉक्टर (जन्म: २० जुलै १८३६ ड्युजबरी, यॉर्कशायर, इंग्लंड)
१९४४: कस्तुरबा गांधी यांचे पुण्यातील आगाखान पॅलेसमधे निधन (जन्म: ११ एप्रिल १८६९)
१९५८: मौलाना अबूल कलाम आझाद स्वातंत्र्यचळवळीतील विद्वान नेते, भारताचे पहिले शिक्षणमंत्री, भारतरत्न (जन्म: ११ नोव्हेंबर १८८८)
१९८२: जोश मलिहाबादी ऊर्दू कवी (जन्म: ५ डिसेंबर १८९४)
१९९३: हरियाणा चे माजी मुख्यमंत्री तसेच ओडीसा आणि मध्य प्रदेश चे माजी गवर्नर भगवत दयाल शर्मा यांचे निधन.
२०००: दामोदर दिनकर तथा मधुकाका कुलकर्णी प्रकाशन व्यवसायात नवनवीन प्रयोगांसाठी ख्याती मिळवलेले प्रकाशक, 'श्री विद्या प्रकाशन'चे संस्थापक (जन्म: २३ आक्टोबर १९२३)
२०००: विनायक सदाशिव तथा वि. स. वाळिंबे लेखक व पत्रकार (जन्म: ११ ऑगस्ट १९२८)
२००९: लक्ष्मण देशपांडे 'वऱ्हाड निघालंय लंडनला' साठी प्रसिद्ध असलेले लेखक, दिग्दर्शक व प्राध्यापक (जन्म: ५ डिसेंबर १९४३)
२००९: डॉ.लक्ष्मण देशपांडे, मराठी लेखक, दिग्दर्शक व कलाकार.

cmyk

# जालना येथील ड्रायपोर्ट लवकरच कार्यान्वित होणार -रावसाहेब दानवे

## जालन्यासाठी खेचून आणलेला देशातील पहिला ड्रायपोर्ट प्रकल्प, मराठवाड्याच्या औद्योगिक व कृषी विकासाला मिळणार चालना



जालना प्रतिनिधी

देशातील पहिला ड्रायपोर्ट जालना येथे उभारण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पहिल्या कार्यकाळात तत्कालीन भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी तसेच माजी केंद्रीय राज्यमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे यांच्या पुढाकारातून मंजूर झाला होता. हा प्रकल्प सुरू करण्यासाठी वेगवेगळ्या पातळीवरचे टप्पे जवळपास पूर्ण झाले असून दोन दिवसांपूर्वीच केंद्रीय महामार्ग यंत्रणेमार्फत आलेल्या सहा निविदांपैकी विकास कोल अँड मिनरल्स प्रा.लि. या कंपनीची निविदा स्वीकारल्याने ड्रायपोर्टवरून प्रत्यक्षात आयात निर्यातीस प्रारंभ होऊ शकतो.

दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी ड्रायपोर्टच्या ऑपरेशन्स अँड मॅनेजमेंट संदर्भातील निविदा उघडण्यात आली. त्यामध्ये एल- १ म्हणून नागपूर येथील विकास कोल ऑण्ड मिनरल्स प्रा. लि. या कंपनीची निवड करण्यात आली आहे. सदरील कंपनी सोबत करार करून आठ दिवसांच्या आत कार्यारंभ आदेश देण्यात येणार असून, त्यानंतर एक ते दोन महिन्यात प्रत्यक्ष मालवाहतूक प्रक्रिया सुरू होईल. जालना शहरालगत जवळपास चारशे एकर परिसरावर या ड्रायपोर्टची उभारणीचे काम सन २०१६ पासून सुरू झाले. प्रारंभी चारशे एकर जमीन संपादित करून त्याला संरक्षणभिंत बांधण्यात आली. मध्यंतरीच्या काळात रेंगाळलेला हा प्रकल्प ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे यांनी जेएनपीटी अर्थात जवाहरलाल नेहरू पोर्ट स्टच्या अधिकाऱ्यांना जालन्यात बोलावून प्रकल्पाला गती दिली. विशेष म्हणजे कस्टम क्लिअरन्स हा आयात आणि निर्यातीसाठी लागणारा महत्त्वाचा घटक याआधीच मंजूर झालेला आहे. आजघडीला ६४ एकरवर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध असून जालना तालुक्यातील दिनेगाव ते ड्रायपोर्टपर्यंत स्वतंत्र रेल्वे रूळ अंथरलेले आहेत. आयात-निर्यातीसाठी मालधक्का देखील तयार आहे. मध्यंतरी लोकसभा निवडणुकीच्या पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या ड्रायपोर्टचे व्हर्च्युअल उद्घाटन केले होते. त्या कार्यक्रमास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रावसाहेब दानवे, आ.अर्जुन खोतकर यांचीही उपस्थिती होती. हा प्रकल्प केवळ जालना जिल्ह्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रासाठी विकासाचे मोठे पाऊल ठरणार आहे. जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीस चालना देणारा हा ड्रायपोर्ट प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठी संबंधित यंत्रणा कार्यरत असून, आगामी काळात जालना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापार नकाशावर ठळकपणे स्थान निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### प्रत्यक्षात काम सुरू होणार असल्याचा आनंद- दानवे

अनेक अडचणींवर मात करून साधारणपणे पुढील महिन्यात निविदा मंजूर केलेल्या विकास कोल अँड मिनरल्स प्रा.लि. कडून प्रत्यक्षात कामाला सुरूवात होईल यात आता शंका राहिली नाही. त्यामुळे रोजगार उपलब्ध होण्यासह मोठ्या कंपन्यांसह शेतकऱ्यांना लाभ होईल याचे समाधान आणि आनंद आपल्याला आहे, अशी प्रतिक्रिया माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी म्हटले आहे.

### विकासाला गती मिळेल - आशिमा मित्तल

जालना येथील केंद्र सरकारचा अत्यंत महत्त्वपूर्ण प्रकल्प म्हणून ड्रायपोर्टकडे पाहिले जात होते. आपण गेल्या सहा महिन्यांपासून त्याबाबत वरिष्ठ पातळीवर बोलण्यासह प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा केला. आता विकास कोल अँड मिनरल्स प्रा.लि या कंपनीची निविदा मंजूर झाल्याचे कळले आहे. त्यामुळे मोठा आनंद झाला असून जालन्यासह मराठवाडा आणि अन्य जिल्ह्यांना या प्रकल्पामुळे मालाची आयात - निर्यात करण्यास मोठी मदत होणार आहे, असे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी म्हटले आहे.

### उद्योग व शेतीला थेट लाभ..!

जालना व परिसरातील स्टील उद्योग, बियाणे उद्योग तसेच विविध कृषी उत्पादनांना या प्रकल्पाचा थेट फायदा होणार आहे. ड्रायपोर्टमुळे कंटेनराइज् मालवाहतूक सुलभ होऊन निर्यात प्रक्रिया स्थानिक पातळीवर पूर्ण करता येईल. कमी खर्चात व जलद गतीने मालाची वाहतूक झाल्याने स्थानिक उद्योगांना इतर राज्यांतील तसेच परदेशातील कंपन्यांशी प्रभावी स्पर्धा करता येणार आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचे दार खुले होणार असून, त्यांना अधिक चांगला दर मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# माजी महापौर अभिषेक कळमकरा- विरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर:राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष तथा माजी महापौर अभिषेक कळकराविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल झाला आहे. शाळेत नोकरीला लावून देतो, असे अमिष दाखवून, वारंवार अत्याचार केल्याचे युवतीने फिर्यादीत म्हटले आहे.

पीडित युवतीच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी गुन्ह्याची नोंद घेतली आहे. अभिषेक कळमकर हा पसार झालेला आहे. अजित पवार राष्ट्रवादीचे उमेदवार संग्राम जगताप यांच्याविरोधात अभिषेक कळमकर याने शरद पवार राष्ट्रवादीकडून निवडणूक लढवली होती. हा गुन्हा दाखल झाल्याने अहिल्यानगरमधील राजकारणात खळबळ उडाली आहे. पीडित युवती ही शिरूर तालुक्यातील असून, एमआयडीसी पोलिसांकडे तिने पहाटे येऊन तक्रार दिली. पीडित युवतीने फिर्यादीत म्हटले आहे की, तीन महिन्यापूर्वी नोकरीच्या शोधात अहिल्यानगरमध्ये आले. तिथं अभिषेक कळमकर याच्या सोशल मीडियावरून संपर्क क्रमांक मिळवत संपर्क केला. परिस्थिती सांगून, नोकरीची गरज असल्याचे सांगितले. दोन-तीन दिवसांनी कुष्ठधाम रोडवर इथं भेटायला मिळवले. तिथं कागदपत्र घेत, एमआयडीसीत माझी शाळा आहे, तिथं कामाला लावून देतो, असे सांगितले. ही शाळा बघण्यासाठी बोलवल्यानंतर, तिथं पीडित युवती आला. या वेळी पीडित युवतीला केडगाव बायपासला उतरवले. अभिषेक कळमकर हा तिथं अलिशान वाहनातून येऊन, मला घेऊन विळद घाट इथं गेला. गाडीत आम्ही दोघे होतो. तिथं गाडी हायवे लगत थांबवून थंडपेय दिले. थंड पेय पिल्यानंतर गुंगी आली. त्यावेळी कळमकर हा आपल्याला स्पर्श करत होता. तिथं वाहनात माझे कपडे काढून जबरदस्ती केल्याचे पीडिताने फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेनंतर आपण खूप घाबरलो होतो. झालेला प्रकार कोणालाच सांगितला नाही. त्यानंतर दोन दिवसांनी अभिषेक कळमकर याने व्हॉट्सअपवर व्हिडिओ कॉल करून, कपडे काढण्यास सांगितले. विरोध केल्यावर जीवे मारण्याची धमकी दिली. या त्रासाला कंटाळून व्हिडिओ कॉलचे स्क्रिने रेकॉर्डिंग केल्याचे पीडिताने फिर्यादीत म्हटले आहे. यानंतर अभिषेक कळमकर याने १८ फेब्रुवारीला कागदपत्र घेऊन शिरूर इथल्या मारवेल हॉटेलवर बोलावलं. नोकरीबद्दल बोलायचे आहे, असे सांगून कळमकर याने एका व्यक्तिसोबत हॉटेलमधील रूम नंबर ११० मध्ये पाटवले. तो व्यक्ती तिथून गेल्यावर अभिषेक कळमकर तिथे आला अन्? माझ्याबरोबर जबरदस्तीने शरीर संबंध ठेवले. या प्रकाराचे व्हिडिओ देखील काढले. या शरीर संबंधाच्या कोणाला सांगितल्यास, मला आणि माझ्या मुलीला जीवे मारण्याची धमकी दिल्याचे पीडिताने फिर्यादीत म्हटले आहे. एमआयडीसी पोलिसांनी कळमकर याच्या शोधात तपास सुरू केला आहे.

# शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान यशस्वी करा -जिल्हाधिकारी मित्तल

जालना प्रतिनिधी

महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर ग्रामिण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने ७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत ''छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान'' टप्पा १ आयोजित करणेबाबत निर्देश दिले आहेत. या कालावधीत जालना जिल्ह्यातील सर्व मंडळांमध्ये अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वय साधून



काम करावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत.

दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी, रजिस्टार ऑफिससह अन्य संबंधित विभागाचे विभागप्रमुखांची बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी त्याबोलत होत्या. यावेळी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी रोहयो मनिषा दांडगे, उप विभागीय अधिकारी परतुर पद्माकर गायकवाड,उप विभागीय अधिकारी अंबड उमाकांत पारधी,उप विभागीय अधिकारी जालना रामदास दौंड, उप विभागीय अधिकारी भोकरदन बी. सर्वणन, जिल्हा कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, सर्व तालुक्याचे तहसीलदार यासह अन्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले की, हे अभियान ७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत मंडळ व नगर परिषद/नगर पंचायत स्तरावर राबविण्यात येणार असून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांचे महसूल विषयक प्रश्न तात्काळ निकाली काढणे हा प्रमुख उद्देश आहे. प्रत्येक तालुक्यात एकदिवसीय समाधान शिबिरे आयोजित करून प्रलंबित फेरफार, ७/१२ दुरुस्ती, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्रे यांसारख्या सेवा 'सिंगल डे सर्व्हिस डिलिव्हरी' तत्त्वावर देण्यात याव्यात, असे त्यांनी निर्देशित केले.

### अभियानाचे मुख्य उद्दिष्ट

''लोकाभिमुख कार्यक्षम गतिमान'' महसूल सेवा देणे हे असून, सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन तक्रारी व प्रलंबित प्रकरणे शिबीरातच निकाली काढण्यावर भर दिला जाणार आहे.

# शिंगणापूर मंदिर, गावाच्या बाहेरील परिसरात मनाई आदेश जारी

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शिंगणापूर, ता. नेवासा गावात, मंदिर तसेच गावाच्या बाहेरील सार्वजनिक रस्ते, चौक, बसस्थानक, प्रवेशद्वार किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी होत असलेला अडथळा किंवा उपद्रव होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच शिंगणापूर गावात व मंदिर परिसरात सार्वजनिक शांतता, सुरक्षितता व सोयीसाठी उपविभागीय दंडाधिकारी सुधीर पाटील यांनी त्यांना प्राप्त अधिकाराचा वापर करत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता,२०२३ चे कलम १५२ (१) () अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

शिंगणापूर गावाच्या बाहेरील सार्वजनिक रस्ते, चौक, बसथांबे, प्रवेश मार्ग किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी उभे राहून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना थांबवणे, दिशाभूल करणे अथवा मध्यस्थी करणे या कृत्यास तात्काळ प्रतिबंध करण्यात आला आहे. कोणत्याही व्यक्तीने देवस्थान ट्रस्ट किंवा प्रशासनाचा अधिकृत प्रतिनिधी असल्याचे भासवू नये व भोजन, निवास किंवा दर्शनाच्या नावाखाली अनाधिकृत कृत्य करु नये. असे कृत्य करणाऱ्या संबंधित व्यक्तींनी तात्काळ अशा सार्वजनिक ठिकाणावरुन हटावे व भविष्यात अशा स्वरुपाची कृत्ये करु नयेत. या आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही आदेशान्वये देण्यात आला आहे.



## जिल्हा माहिती कार्यालयात बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

जालना । प्रतिनिधी

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आणि थोर समाजसुधारक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा माहिती कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# बस प्रवासासाठी स्मार्ट कार्ड नोंदणी सुरू

## ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला, विद्यार्थी यांना होणार फायदा

अंबड । प्रतिनिधी

अंबड आगारात अमृत ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग व विद्यार्थी प्रवाशांसाठी एस.टी. बस प्रवासाकरिता एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी उपक्रमाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले.



शासनाच्या निर्देशानुसार विविध सवलत धारक प्रवाशांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. त्यासाठी नवीन बस स्थानकातील आरक्षण व पासेस (वाहतूक विभाग) काउंटरवर नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दि. २१.०२.२०२६ रोजी अंबड आगाराचे आगार प्रमुख साठे, गिलचे, प्रमुख अतिथि नगरसेवक तथा उपनगराध्यक्ष विश्वजीत खरात यांच्या हस्ते, ईबिक्स प्रतिनिधी मयूर वाव्हळ यांच्या उपस्थितीत प्रतिनिधी मोनिका ज्ञानेश्वर थोरात यांनी प्रथम ज्येष्ठ नागरिक श्रीमती नंदाबाई थोरात यांची अधिकृत नोंदणी करून पावती आगार प्रमुखांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यावेळी एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी उपक्रमाचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले. अंबड आगार कार्यक्षेत्रातील सर्व रा.प.म. प्रवाशांनी सदर स्मार्ट कार्डची नोंदणी करून घ्यावी, जेणेकरून भविष्यात एस.टी. बस प्रवास अधिक सुलभ व सोयीस्कर होईल, असे आवाहन अंबड आगारातर्फे करण्यात आले. यावेळी मान्यवर व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबडमध्ये शिवकालीन युद्धकलेचा थरार... सव्यसाची गुरुकुलमच्या रणरागिनी अन् मावळ्यांनी जिंकली सर्वांची मने!

## नगरसेवक केदार कुलकर्णी यांच्या पुढाकाराने शहरवासियांना पर्वणी

**अंबड । प्रतिनिधी**

वेंगरूळ (ता.भुदरगड जि.कोल्हापूर) येथील सव्यसाची गुरुकुलमचे मावळे व रणरागिनींनी शिवजयंतीनिमित्त अंबड येथे सादर केलेल्या काठी फिरवणे, तलवारबाजी व दांडपट्ट्याच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी अंबड शहरवासियांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. शिवकालीन युद्धकलेचे रोमांचक प्रात्यक्षिक सादर करून पारंपरिक कौशल्यांचे दर्शन घडवत, या रणरागिनी आणि मावळ्यांनी उपस्थितांना अक्षरशः भारावून टाकले.

शिवजयंतीनिमित्ताने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन अंबड नगर पालिकेच्यावतीने नगराध्यक्षा सौ.देवयानी केदार कुलकर्णी, नगरसेवक केदार कुलकर्णी यांच्या पुढाकाराने समाजभान टीमचे दादासाहेब थेटे यांच्यामार्फत करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात आ. नारायण कुचे व नगराध्यक्षा सौ.देवयानी कुलकर्णी यांच्या हस्ते तसेच सर्व




नगरसेवकांच्या उपस्थितीत शस्त्र पूजनाने करण्यात आली. यावेळी कोल्हापूरहून आलेल्या सव्यसाची गुरुकुलमच्या चमूने एकापेक्षा एक सरस प्रात्यक्षिके सादर केली. विजेच्या चपळाईने चालवलेली तलवारबाजी, काठी फिरवणे, एक महिलेने चार जणांचा तलवारबाजीने केलेला सामना असे अनेक शौर्यमय प्रात्यक्षिक पाहून नागरिक थक्क झाले. शिवकालीन युद्धकलेतील अत्यंत कठीण मानला जाणारा दांडपट्टा फिरवण्याची कलाकारांची शैली कौतुकास्पद ठरली. पारंपरिक भारतीय युद्धकलेचे तसेच व्यायाम, दंड बैठकाचे विविध प्रकार, सूर्य नमस्कार, चंद्र नमस्कार, भूमी नमस्कार आदीचे यावेळी उत्तम सादरीकरण करण्यात आले. हा कार्यक्रम केवळ मनोरंजनाचा नव्हे तर तरुण पिढीला आपल्या वैभवशाली इतिहासाची आणि युद्धकलेची ओळख करून देणारा ठरला. त्यामुळे आयोजक म्हणून नगर परिषदेने विशेषत नगरसेवक केदार कुलकर्णी यांनी घेतलेल्या पुढाकाराचे व परिश्रमाचे शहरात मोठे कौतुक होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शरद मगर व गुरुकुलमची सई सुधन्वा गोंधळेकर यांनी केले. कार्यक्रमाला उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर धुमाळ, पोलीस निरीक्षक संतोष घोडके, उपनगराध्यक्ष विश्वजित खरात, नगरसेवक गंगाधर वराडे, धनराज ठाकूर, सुहास सोडाणी, संदिप खरात, सौरभ कुलकर्णी, उज्वल कुचे, बाळू शहाणे, कृष्णा बाबर, दिलीप खरात, बंडू जाधव, फेरोज शेख, अमोल वराडे, सुरेश गुडे, शाहूल खरात, विठ्ठलसिंग राजपूत, अर्जुन भोजने, अफरोज पठाण, जितेंद्र बुर्ले, सचिन खरात आदीसह सर्व नगरसेवक तसेच शहरातील विविध शाळेचे विद्यार्थी, शिक्षक, तरुण व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नगर परिषद तसेच समाजभानच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर अंबड शहरात प्रथमच यावर्षी खऱ्या अर्थाने शिवजयंती साजरी झाली, दरवर्षी असेच प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करायला हवेत अशा प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या.

# बसस्टॅन्ड जवळील २ लॉजवर वेश्या व्यवसायावर छापा

## ७ पुरुष जेरबंद १३ महिलांची सुटका

जालना प्रतिनिधी

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षास मिळालेल्या गुप्त बातमी वरून बसस्टॅन्ड रोड वरील वैष्णवी लॉज व मोक्ष लॉज येथे लॉज मालक हे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी त्यांच्या लॉजमधे महिलांना आणून त्याच्याकडुन अनैतिक देहव्यापार करून घेत आहेत, अशी माहिती मिळाल्यावरून पोलिसांनपी छापा टाकला. यात सात पुरूषांना ताब्यात घेण्यात आले तर १३ महिलांची सुटका करण्यात आली.

या दोन्ही ठिकाणी कारवाई करणेबाबत मा. पोलीस अधिक्षके यांच्याशी चर्चा करुन त्यांच्या सुचनेप्रमाणे स्थागुशाचे पोनि. पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाचे अधिकारी व स्टाफचे अंमलदार यांनी मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी छापा टाकला. छापा मारला असता मोक्ष लॉजचे मालक सचिन पवार रा. वाटुर ता. परतुर, मैनेजर संतोष जाधव रा. खरपुडी याच्यामार्फत तसेच वैष्णवी लॉज चे मैनेजर कैलास कुमार रा. सावा ता. जि चित्तोडगड राजस्थान. ह. मु. वैष्णवी लॉज जालना तसेच (ग्राहक) वैष्णवी लॉज मध्ये पंकज निकाळजे, तुषार बत्रा रा. परतुर, रोहीत बोर्डे, करण वाहुळे यांच्यासह एकुण १३ पिडीत महिलापैकी पश्चिम बंगाल राज्यातील ०६ तसेच आसाम राज्याच्या ०३ व छ. संभाजीनगर येथील ०४ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली. याशिवाय ८१,७५०/ -असा मुद्देमाल, रोख रक्कम व साहीत्य असे मिळून आले. सदरबाजार येथे महीलांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ कलम ३,४,५,६ प्रमाणे प्रभारी अधिकारी अ.मा.वा.प्र. कक्ष पोउपनि गणेश शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला. सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, मा. अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, परि. पोलीस अधिक्षक जान्हवी शेखर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक पंकज जाधव (स्थागुशा) यांच्या मार्गदर्शनाखाली अ.मा.वा.प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे, यांच्यासह पोलीस पथकाने केली.

# वाहतुकीचे नियम पाळले तर मृत्यूचे प्रमाण घटेल -अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर

बीड । प्रतिनिधी

**विद्यार्थि आणी नागरीकानी रस्ता सुरक्षेचे नियम पाळले तर निश्चितच रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण कमी होईल आणि त्यामुळे मृत्यूचे प्रमाणही घटेल असे प्रतिपादन अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी जिल्हा वाहतूक शाखेच्या रस्ता सुरक्षा अभियान समारोपप्रसंगी बोलताना केले.**

जिल्हा वाहतूक शाखा बीड यांच्या वतीनेदि.१ते ३१जानेवारी दरम्यान राबवण्यात आलेल्या रस्ता सुरक्षा अभियानाचा समारोप २०फेब्रुवारी रोजी पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर संपन्न झाला. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी सांगितले की रस्ते वाहतूक करताना रस्त्याच्या वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे. यामुळे निश्चितपणे रस्ते अपघातात प्राण जाणाऱ्यांची संख्या कमी होईल. विद्यार्थ्यांनी परवाना असल्याशिवाय वाहन चालवू नये. जे दुचाकी चा वापर करतात त्यांनी हेल्मेटचा व चार चाकी धारकांनी सीट बेल्टचा वापर करावा. रस्त्यावरून जाताना आपल्यासमोर एखादा अपघात घडला तर आपण अपघात ग्रस्तांची मदत करावी. विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये रस्ते वाहतुकीच्या नियमांची जागृती व्हावी हा रस्ता सुरक्षा अभियानाचा उद्देश आहे. यावेळी शहर पोलीस उपाधीक्षक पूजा पवार ,भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी राहुल कुमार, गृह विभागाचे पोलीस उपाधीक्षक



## जिल्हा वाहतूक शाखेच्या रस्ता सुरक्षा अभियानाचा समारोप

उमाशंकर कस्तुरे, पोलीस मुख्यालयाचे राखीव पोलीस निरीक्षक पांडुरंग दलाई, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता अक्षय गव्हाणे ,सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरज पवार, रोटरी क्लबचे अध्यक्ष राहुल बोरा, बीड गुड्स ट्रान्सपोर्ट संघटनेचे कोषाध्यक्ष दिलीप वांगीकर व त्यांचे सहकारी, शालेय रिक्षा युनियनचे अध्यक्ष बाबुभाई व त्यांचे सहकारी, पगारिया ऑटो प्रायव्हेट लिमिटेड चे जनरल मॅनेजर दिलीप भाटिया, सहाय्यक व्यवस्थापक हर्ष साळवी आदी उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप व विजय जाधवर यांनी केले. रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धा चित्रकला स्पर्धा निबंध स्पर्धा व घोषवाक्य स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. चंपावती विद्यालय भगवान विद्यालय व शिवाजी विद्यालय या शाळेतील एनसीसी पथकाचे व चंपावती विद्यालयाच्या स्काऊट गाईडचे शिस्तबद्ध संचलन सादर झाले. समारोपाच्या कार्यक्रमाचे प्रस्ताविक वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांनी तर आभार प्रदर्शन पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशवंत विद्यालयाचे शिक्षक गाडेकर के. बी. व शेळके एम.बी.यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेच्या सर्व अंमलदारांनी परिश्रम घेतले.

# आ.सोळंके, आ.धस व आ.पंडित यांच्याकडून जगताप कुटुंबियांचे सांत्वन

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी नगरपंचायतीचे नगराध्यक्ष शेषेराव जगताप आणि राष्ट्रवादीचे नेते भारत जगताप यांचे वडील अभिमन्यू विश्वंभर जगताप यांचे रविवारी उपचारादरम्यान दुःखद निधन झाले आहे. मंगळवारी आष्टीचे आ.सुरेश धस, गुरुवारी माजलगांवचे आ.प्रकाश सोळंके व शुक्रवारी गेवराईचे आ.विजयसिंह पंडित यांनी व राजकीय, सामाजिक आणि इतर क्षेत्रातील मान्यवरांनी वडवणी याठिकाणी येत दुःखांकित जगताप कुटुंबीयांची भेट घेवून सांत्वन केले. व या दुःखाच्या प्रसंगी आम्ही आपल्या सोबत आहोत अशी भावना व्यक्त करुन धीर दिला.



वडवणी येथील नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप व राष्ट्रवादीचे नेते भारत दादा जगताप यांचे वडील माजी उपसरपंच तसेच सर्वपरिचीत व्यक्तीमत्त्व अभिमन्यू आण्णा जगताप यांचे दि.१५ फेब्रुवारी २०२६ रविवार रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी उपचारादरम्यान दुःखद निधन झालेले आहे. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु होते. मात्र उपचारादरम्यान रात्री १०:१५ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. सोमवारी दुपारी १२ वाजता वडवणी शहरातील वैकुंठधाम याठिकाणी अतिशय जड अंतःकरणाने व साश्रू नयनांनी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच आष्टी-पाटोदा-शिरुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा जगताप कुटुंबीयांचे पूर्वीपासूनचे स्नेही असणारे आ.सुरेश अण्णा धस यांनी या दुःखद प्रसंगी दि.१७ मंगळवार रोजी त्यानंतर माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा जगताप कुटुंबीयांचे नेते तथा मार्गदर्शक ◀◀ पान ३ वर

# विवाहितेच्या छळाच्या गुन्ह्यात सासरकडील आरोपींना मोठा दिलासा; न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर

बीड । प्रतिनिधी

बीड येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याच्या आरोपाखाली भारतीय न्याय संहिता () च्या कलम ८५, ११५(२), ३५१(२), ३५२ आणि ३(५)

गुन्हा दाखल असलेल्या सासरच्या मंडळींना बीड जिल्हा व सत्र न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. या प्रकरणातील संशयित आरोपींना न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर करत अटकेपासून संरक्षण दिले आहे.

संबंधित पीडित महिलेने सासरच्या मंडळींविरुद्ध तक्रार दिली होती. या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिसांनी भारतीय





न्याय संहिता () च्या कलम ८५, ११५(२), ३५१(२), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला होता. अटकेची टांगती तलवार असल्याने सासरच्या नातेवाईकांनी वकिला मार्फत बीड जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी धाव घेतली होती.

अ‍ॅड.शेख सद्दाम शेख इस्माईल यांचा यशस्वी युक्तिवाद:

या अर्जावर सुनावणी दरम्यान बचाव पक्षाच्या वतीने अ‍ॅडव्होकेट शेख सद्दाम शेख इस्माईल यांनी अत्यंत प्रभावी कायदेशीर बाजू मांडली. त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, ''आरोपींवरील आरोप हे पुर्नपने चुकीचे व खोटे सरसकट स्वरूपाचे असून तपासासाठी त्यांची कोठडीत रवानगी करण्याची कोणतीही तांत्रिक आवश्यकता नाही. आरोपी पोलिसांना तपासात पूर्ण सहकार्य करण्यास बांधील आहेत.''

या कायदेशीर प्रक्रियेत अ‍ॅड. सद्दाम शेख यांना अ‍ॅड. आदर्श अरूणराव जाधव अ‍ॅड.विनय मा. कुलकर्णी आणि अ‍ॅड. दिनेश विनायकराव जाधव यांनी मोलाचे सहकार्य केले.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा अंबाजोगाई यांच्या वतीने रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा अंबाजोगाई यांच्या वतीने शिवरायांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. महामानवांच्या विचारांचा वारसा भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा अंबाजोगाई सातत्याने जोपासत आहे. यावेळी शहर शाखेच्या उपस्थित



वक्त्यांनी बहुजनप्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यातील समता, न्याय आणि सर्वधर्मसमभावाच्या विचारांवर प्रकाश टाकला. यावेळी बोलताना शहराध्यक्ष सुधाकर हातागळे यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एका जाती-धर्माचे नसून ते संपूर्ण बहुजन समाजाचे आणि मानवाधिकारांचे रक्षक होते. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देखील शिवरायांच्या कार्याचा ◀◀ पान ३ वर

# माजलगाव : व्यंकटेश लॉजमध्ये आढळला तरूणाचा मृतदेह

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील बीड रोड या मुख्य रस्त्यावर असलेल्या व्यंकटेश लॉज मध्ये एका ४० वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळल्याची घटना दि २० फेब्रुवारी शुक्रवार रोजी रात्री हॉटेल मॅनेजरच्या लक्षात आली असून माजलगाव शहर पोलीसात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.



शहरातील मध्यवस्तीत असणाऱ्या बीड रोडवरील व्यंकटेश या खासगी लॉजमध्ये मुक्कामासाठी थांबलेल्या चाळीस वर्षीय व्यक्तीचा मृतदेह दि २० फेब्रुवारी शुक्रवार रोजी रात्री आढळून आला.लॉज कर्मचाऱ्यांना पूर्ण दिवसभर दरवाजा न उघडल्याने संशय आल्यावर दरवाजा उघडण्यात आला. त्यावेळी संबंधित व्यक्ती खोलीत मृत अवस्थेत आढळून आली.या घटनेची माहिती तत्काळ माजलगाव पोलीस ठाण्यात देण्यात आली.पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली यावेळी मरुन पडलेल्या व्यक्तीजवळ असलेल्या आधार कार्ड वरून सदरील मयत व्यक्ती श्रीकृष्ण प्रकाश डाके ◀◀ पान ३ वर

# प्रा.डॉ.तानाजी आगळे यांची खो-खो च्या राष्ट्रीय निवड समितीवर वर्णी

बीड । प्रतिनिधी

तालुका पाटोदा येथील वसंतदादा पाटील महाविद्यालयात क्रीडा विभागात कार्यरत असणारे क्रीडा प्राध्यापक डॉ. तानाजी आगळे यांनी गेल्या २९ वर्षांच्या कार्यकाळामध्ये अनेक राज्य राष्ट्रीय विद्यापीठ घडवले आहेत हे खेळाडू घडवण्याचे खेळाडू हिताचे कार्य त्यांचे आजही सुरू असून वसंतदादा पाटील महाविद्यालयाचा खो-खो संघ विद्यापीठ स्तरावर आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत गेले २२-२३ वर्षांपासून सातत्याने कधी विजयी तर कधी उपविजेयी स्थानावर असतो तसेच कनिष्ठ विभागाचा खो-खो मुला मुलींच्या संघाने जिल्हा विभाग व राज्यस्तरावर अनेक पारितोषिके महाविद्यालयाला मिळवून दिली आहेत. अशा या गुणवान खेळाडूला आगळे सरांचे मार्गदर्शन सातत्याने लाभत आहे. आगळे सर हे महाविद्यालयीन कार्यभार सांभाळून



दैनंदिन सायंकाळच्या सत्रात क्रीडा संकुलाच्या खो-खो क्रीडांगणावर प्रशिक्षण देतात. अशा या त्यांच्या सर्व कार्याची नोंद घेऊन ओडिसा येथील भुवनेश्वर (कटक अथागढ ) येथे होणाऱ्या कुमार/कुमारी राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी संघ निवडीची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे. त्यांच्याबरोबर श्री. गणेश ताटे (नाशिक) व श्री. सचिन पाटील (जालना) हे संघ निवड समिती सदस्य असून वरील स्पर्धेसाठी नि:पक्षपातीपणे संघ निवड करतील असा विश्वास खो-खो महाराष्ट्र समन्वयक संघाच्या वतीने राष्ट्रीय समन्वयक खो-खो चे भीष्माचार्य मा. श्री. सुरेश शर्मा (दिल्ली) यांनी तसेच खो-खो महाराष्ट्र समन्वयक मा. श्री. सुरेश गांधी (ठाणे), श्री. मंदार देशमुख (नाशिक), श्री. अजय पवार (अहिल्यानगर) श्री. प्रशांत पवार (सांगली) यांनी व्यक्त केला. ◀◀ पान ३ वर

# प्रभाबाई केंद्रे यांचे निधन

केज । प्रतिनिधी



तालुक्यातील होळ येथील प्रभाबाई सखाराम केंद्रे यांचे वृद्धपकाळने शुक्रवारी (दि.२०) निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. त्यांच्यावर होळ येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या भगवान युवा सेनेचे अध्यक्ष विजय केंद्रे यांच्या मातोश्री होत.

# संतांमुळेच मानवी जीवन सफल होते -ह.भ.प. सुनितातार्इ आंधळे

माजलगाव । प्रतिनिधी

संतांमुळेच मानवी जीवन सफल होते. संत हे दुसऱ्यांना सुखी करण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घालत असतात. त्यामुळे संतांची संगत असणे गरजेचे असून, मनुष्याने संतांच्या सान्निध्यात राहून त्यांचे विचार-आचार आत्मसात करावेत, असे प्रतिपादन हभप सौ.सुनितातार्इ आंधळे यांनी केले.त्या माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथील लाल हनुमान मंदिरातील अखंड हरिनाम सप्ताहातील सहाव्या दिवसाच्या किर्तन रुपी सेवेत बोलत होत्या.

पुढे बोलतांना त्या म्हणाल्या संताची संगत इतकी महान आहे की,त्यांचा सहज जरी सहवास घडला तरी दुर्धर असणारी वासना जि



आपणास भगवंताच्या प्राप्तीत आड येते व जन्म मरणाच्या फेर्यात अडकवते ति बिजासह जळुन जाते. आणि मग या जिवाला त्या भगवंताचे नाम गोड लागते व त्या नामाने त्याला ब्रम्हसुखाची अनुभुती येते. भगवंताचे नामस्मरण करा,आई वडिलांची सेवा करा असे ताईने बोलतांना सांगितले. त्यांना हारमोनियम साथ अभिमन्यू महाराज आंधळे, मृदुंग साथ मनोहर महाराज थोरे, गायन साथ निवृती महाराज शिंदे,महादेव महाराज कसपटे,बळीभाऊ म. पास्टे, मधुकर म.सर्जे,राधेश्याम म.खेत्री,मलकार्जुन म.खेत्री, बाबासाहेब म. गोंडे,भास्कर म.खेत्री,वसंत म. बल्लाळे,विणेकरी सुदाम म.जंगले यांनी दिली.यावेळी या किर्तन श्रवणासाठी पंचक्रोशीतील महिला व पुरूष भाविकांची मोठी उपस्थिती होती.

# १२१ रक्तदात्यांनी रक्तदान देऊन वाढदिवसाच्या अनोख्या शुभेच्छा युवा नेत्याला दिल्या

आष्टी । प्रतिनिधी

जामगावचे सरपंच राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांनी भरलेला प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला. समाजहिताच्या उपक्रमांद्वारे वाढदिवस साजरा करण्याची परंपरा जपत त्यांच्या मित्रपरिवाराने रक्तदान शिबिर व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून अनोखा आदर्श घालून दिला.

वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर

बीड येथील हंबर्डे महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल १२१ रक्तदात्यांनी रक्तदान करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. अहिल्यानगर येथील



डॉक्टर पवार यांच्या सुरभी रक्तपेढीने शिबिराचे नियोजन व वैद्यकीय व्यवस्थापन पाहिले.

''रक्तदान हे श्रेष्ठ दान'' या भावनेतून आयोजित या उपक्रमामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळणार आहे एकदिवसीय क्रिकेट मालिकेचा उत्साह आष्टी शहरात आयोजित एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेला युवकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

स्पर्धेत ८ संघांचा सहभाग

अंतिम सामन्यात मॉर्निंग इलेव्हन संघ विजेता ठरला धवलगिरी चॅम्पियन संघ उपविजेता

या स्पर्धेमुळे युवकांमध्ये क्रीडाभावना, एकोपा व सामाजिक एकजूट वाढीस लागली. पुस्तक रूपी शुभेच्छा अनोखा उपक्रम वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छाऐवजी पुस्तक भेट देण्याचा उपक्रम राबवण्यात आला.

ज्ञानवृद्धीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

समाजकार्यात कायम पुढे

सुरेश धस यांचे पुतणे असलेले राधेश्याम धस हे नेहमीच मतदारसंघातील सुखदुःखात सहभागी होणारे, सामाजिक कार्यात अग्रेसर ◀◀ पान ३ वर

# डोंगराच्या कुशीत वसलेल्या रुई गावाचा आदर्श घ्यावा -अभिनेत्री रिंकू राजगुरू

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत विविध कामांची केली पाहाणी; आदर्श महिला बचतगटातील पाच महिलांचा पैठणी साडी देऊन सन्मान

वडवणी । प्रतिनिधी

डोंगराच्या कुशीत वसलेल्या रुई (पिंपळा) ग्रामपंचायतीने सर्वांगीण विकासाचा आदर्श निर्माण केला असून इतर गावांनी या गावाचा आदर्श घ्यावा, असे प्रतिपादन सैराट फेम सिने अभिनेत्री रिंकू राजगुरू यांनी केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत आयोजित कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. शुक्रवार दि. २० रोजी रुई पिंपळा येथे सिने अभिनेत्री रिंकू राजगुरु यांनी भेट देऊन विकास कामाची पाहणी केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ, महात्मा गांधी आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. त्यानंतर गावातील उत्कृष्ट काम करणाऱ्या पाच आदर्श महिला बचतगटातील पाच महिलांचा पैठणी साडी देऊन रिंकू राजगुरू यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी प्लास्टिकमुक्त उपक्रमाची सुरुवात ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून प्लास्टिकमुक्त गावाच्या दिशेने पाऊल टाकत कापडी पिशवीचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी दाखवलेले मैदानी खेळाचे प्रात्यक्षिक मान्यवर व अभिनेत्री रिंकू राजगुरू यांनी पाहिले व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



तसेच शाळेतील डिजिटल विभागाचे उद्घाटन देखील केले. तसेच गावातील अंगणवाडीला देखील भेट दिली. व गावातील विविध विकास कामाची पाहणी करत तसेच सरपंच मयूर आंधळे यांनी परळी येथील महापशुधन एक्स्पोत गावातील १२० लोकांना पर्यटन सहलीसाठी घेऊन गेल्याने कौतुक करण्यात आले.अभिनेत्री रिंकू राजगुरु यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पुढे बोलताना अभिनेत्री रिंकू राजगुरू म्हणाल्या की,नरेगाच्या माध्यमातून रुई ग्रामपंचायतीने उल्लेखनीय काम केले असून ३१०० फळझाडांची लागवड करण्यात आली आहे.गावाला 'मॉडेल व्हिलेज' बनवण्यासाठी प्रयत्न सुरू असून जिल्ह्यात टॉप मध्ये स्थान मिळावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या. गाव सुंदर करण्यासाठी सर्वांगीण प्रयत्न करा, गाव सुंदर कसे करता येईल आणि पारितोषिक आपल्या गावाला कसे मिळेल, यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत. डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या रुई (पिंपळा) गावात सर्व सुखसोयी उपलब्ध आहेत. या गावाचा आदर्श इतर गावांनी घ्यावा. त्यांनी सरपंच मयूर आंधळे यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे,गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, सरपंच मयुर आंधळे, छायाताई शंकरराव आंधळे, सहाय्यक गटविकास अधिकारी पोहरेकर, विस्तार अधिकारी अशोक निरडे, बोरफडीचे सरपंच कैलास घुगे, पोलीस उपनिरीक्षक श्याम गायकवाड, पूजा खाडे, सविता लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच ड. मयूर आंधळे व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल राठोड व विष्णू आंधळे सर यांनी केले. यावेळी महिला, तरुण, तरुणी व ग्रामपंचायत सदस्य आणि पंचायत समितीचे कर्मचारी, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ◀◀ पान ३ वर

# खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मंजूर

बीड । प्रतिनिधी

दि. १४/०१/२०१६ रोजी चकलांबा पोलीस स्टेशन ता. गेवराई जि. बीड येथे एक इसमाच्या विरुद्ध भारतीय न्याय सहिता अंतर्गत कलम१०९,११८ (२), ११८(१), ३२४ (४), ३५२, ३५१(२) नुसार गुन्हा दाखल झाला होता. ज्याचा गु.र न ११/२०२६ असा आहे.या गुन्ह्यांमध्ये आरोप असणाऱ्याचा अटकपूर्व जामीन अर्ज क्रमांक ६७/२०२६ नुसार मा. जिल्हा सत्र व न्यायाधीश बीड यांच्या कोर्टासमोर अटकपूर्व जामीनाचा अर्ज दाखल केला होता, सदरील जामीन अर्जावर दोन्ही बाजूने युक्तिवाद मा. न्यायालयाने ऐकून घेतला. पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी कायदेशीर लढा उभारणे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे यासाठी सखोल अभ्यास, ठोस पुरावे आणि कायद्याच्या तरतुदीचा योग्य वापर करत पीडित व्यक्तीस न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी युक्तिवाद



आरोपीकडून ड. किशोर खेडकर, ड. अनिल बारगजे यांनी केल्यामुळे पीडित व्यक्तीस दिनांक २०/०२ /२०२६ रोजी मा.सत्र न्यायालय,बीड यांनी आरोपींस अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केलेला आहे. या कामी ड. विलास ढाकणे, ड झीने बी , ड सुनील आंधळे ,बीड या वकिलांनी अनिल बारगजे व किशोर खेडकर यांना सहकार्य केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# 'कुरकुरे' देण्याचे आमिष दाखवून चिमुकलीवर अत्याचार अत्याचारानंतर पुन्हा स्थानकावर सोडले; विकृतास अटक

**पुणे | प्रतिनिधी**

**पुणे रेल्वे स्थानकावरून चार वर्षांच्या मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. पुणे लोहमार्ग पोलिसांनी नराधम महेश यादव (वय २५) याला अटक केली असून तो मूळचा मध्य प्रदेशचा आहे.**

मध्य प्रदेशातील खंडवा जिल्ह्यात राहणारी ३० वर्षांची महिला तिचा पती, सासू आणि चार मुलांसह रोजगारासाठी महाराष्ट्रात आली होती. मनमाड-सोलापूर या भागात महिला व तिचा पती काम करत होते.१६ फेब्रुवारीला रात्री महिला आणि तिचे कुटुंबीय खंडवाला जाण्यासाठी पुणे रेल्वे स्थानकावर पोहोचले. खंडवाकडे जाण्यासाठी ते प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर थांबले होते. दुसऱ्या सकाळी लवकर त्यांची ट्रेन होती.




१७ फेब्रुवारी रोजी पहाटे दीड वाजता महिलेचा पती स्वच्छतागृहाकडे जात असताना त्याला चार वर्षांची मुलगी दिसली नाही. त्यांनी शोधाशोध केली असता ती सापडलीच नाही. पहाटे तीनच्या सुमारास त्यांनी रेल्वे पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास केला असता लाल रंगाचा टी-शर्ट व अर्धी पॅन्ट घातलेला एक तरुण मुलीचा हात धरून तिला घेऊन जाताना दिसला. नराधम तरुणासोबत जाताना मुलीने प्रतिकार केला नव्हता त्यावरुन तो पीडितेच्या ओळखीचा असावा हे स्पष्ट झाले. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज मुलीच्या पालकांना दाखवताच त्यांनी नराधमाला ओळखले. नराधम तरुण हा ट्रेन प्रवासात पीडित मुलीच्या कुटुंबियांच्या शेजारीच बसला होता, अशी माहिती समोर आली. एकीकडे पोलीस पुण्यातील बुधवार पेठ आणि इतर भागातील बांधकाम साईटवर कसून शोधमोहीम राबवत असतानाच दुसरीकडे सकाळी साडे पाचच्या सुमारास नराधम महेश हा पीडित चिमुकलीला घेऊन रेल्वे स्थानकात पोहोचल्याचे लक्षात आले. गस्त घालणाऱ्या पोलिसांनी लगेच संशयिताला ताब्यात घेत चिमुकलीची सुटका केली. महेशने चिमुकलीला खाऊ देण्याच्या बहाण्याने रेल्वे स्थानकाबाहेर नेले. यानंतर निर्जनस्थळी नेत त्याने आक्षेपार्ह वर्तन केले, अशी माहिती चिमुकलीने महिला पोलिसांना दिली. मुलीच्या कपड्यांवरील रक्ताचे डाग, पोटदुखीची तक्रार यावरुन पोलिसांना संशय बळावला. वैद्यकीय तपासणीत चिमुकलीवर अत्याचार झाल्याचे उघडकीस आले असून पोलिसांनी महेशला अटक केली आहे. महेश हा मूळचा मध्य प्रदेशमधील बालाघाटचा रहिवासी आहे. भारतीय न्याय संहिता कलम १३७(२), ६५(२) तसेच झजउडज कायद्याच्या कलम ४ व ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# डिजिटल अरेस्टच्या नावाखाली दोन ज्येष्ठांना तब्बल ३.५ कोटींचा गंडा

पुणे । प्रतिनिधी

वानवडी येथील ८६ वर्षीय निवृत्त बँक व्यवस्थापकाला आरोपींनी स्वतःला मुंबई पोलीस दलातील अधिकारी असल्याचे भासवत संपर्क साधला. त्यांच्या नावावरून बँक खाते वापरून मनी लाँडरिंग झाल्याचा आरोप करीत, कुलाबा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असल्याची खोटी माहिती देण्यात आली.




अटक टाळायची असेल तर तपासासाठी रक्कम सुरक्षित खात्यात जमा करा, असा दम देत आरोपींनी त्यांच्याकडून टप्प्याटप्प्याने एक कोटी २७ लाख ५३ हजार रुपये वेगवेगळ्या खात्यांत वळते केले. विशेष म्हणजे, तक्रारदाराच्या दोन मुली शेजारीच राहत असूनही 'ही बाब कोणालाही सांगितल्यास तत्काळ अटक होईल' अशी भीती दाखवून चोरट्यांनी त्यांना पूर्णपणे एकाकी केले.

काही दिवस वडिलांच्या वागण्यात बदल जाणवल्यानंतर मुलींनी चौकशी केली आणि संपूर्ण प्रकार उघडकीस आला. दरम्यान, एरंडवणे परिसरातील ७० वर्षीय ज्येष्ठ नागरिकालाही अशाच पद्धतीने जाळ्यात ओढण्यात आले. आरोपींनी स्वतःला डेटा प्रोटेक्शन संस्थेचे अधिकारी सांगत त्यांच्या आधार कार्डचा वापर करून अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित होत असल्याची खोटी तक्रार असल्याचे सांगितले. पुढे तर त्यांचा दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याचा आणि प्रकरण सुप्रीम कोर्टात असल्याचा बनाव करण्यात आला. 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली व्हिडीओ कॉलवर नजर ठेवत, कोणाशीही संपर्क साधू न देण्याची सक्ती करण्यात आली. भीतीच्या छायेत ठेवून विविध खात्यांतून दोन कोटी एक लाख ९० हजार २४७ रुपये जमा करून घेण्यात आले.

# भिगवण प्रकरणातील तरुणीची सुधारगृहात रवानगी करण्याचा निर्णय, पोलीस सूत्रांची माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील भिगवण प्रकरणातील अपहरण झाल्याची तक्रार असलेली मुलगी मध्यरात्री दीडच्या सुमारास बारामती शहर पोलीस ठाण्यामध्ये हजर झाली. संबंधित तरुणासह मुलगी भिगवण पोलीस ठाण्यात पोहोचली. यानंतर पोलीस संबंधित तरुणाला दुसरीकडे घेऊन गेले होते. यानंतर मुलीची आई बारामती पोलीस स्टेशनला आली होती. मात्र, मुलगी आई सोबत जाण्यास तयार नव्हती. पोलिसांनी संबंधित तरुणीला साडे बारा वाजता कोर्टात हजर केलं. यानंतर संबंधित तरुणीची सुधार गृहात रवानगी करण्यात आली आहे. तर, मुलाची चौकशी करुन निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती आहे.



भिगवण घटनेतील मुलीला सुधार गृहात तिची रवानगी करण्यात आली. तर मुलाबाबत चौकशी करून पुढचा निर्णय घेतला जाईल, अशी माहिती पोलीस सूत्रांकडून देण्यात आली आहे. इंदापूर तालुक्यातील भिगवण घटनेतील युवतीला आज कोर्टात हजर केल्यानंतर तिचा जबाब नोंदवला गेला. जबाब नोंदवल्यानंतर मुलीचे मेडिकल करून पुनर्वसन केंद्रात तिची रवानगी करण्यात आली. तर मुलाबाबत चौकशी करून पुढचा निर्णय घेतला जाईल, अशी माहिती पोलीस सूत्रांकडून देण्यात आली आहे. मुलगा आणि मुलगी भिगवममधून बाहेर पडल्यानंतर श्रीगोंदा, अहिल्यानगर, शिक्रापूर, पुणे सासवड असा प्रवास करून महाबळेश्वरला गेले. महाबळेश्वरवरून मुलगी आणि मुलगा मध्यरात्री दीड वाजता बारामती शहर पोलीस ठाण्यात हजर झाले. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप गिल यांनी पत्रकार परिषद घेत सदर प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे, अशी माहिती दिली. मुलीच्या आई आणि भावाचं म्हणणही ऐकून घेतलं आहे. त्या मुलीने आपल्या आई आणि भावासमोर देखील आपलं म्हणणं मांडलं आहे. मात्र तिच्या आई आणि भावाचा वेगळा आरोप असल्याने आम्ही आता आणखी चौकशी करत आहोत. संबंधित तरुणीने कोर्टासमोरही तिचं सगळं म्हणणं मांडलं आहे.

संबंधित तरुणीने एक प्रतिज्ञापत्र तयार केलं आहे. या प्रतिज्ञापत्रात माझं आणि त्याचं प्रेम होतं. मी हे घरच्यांना सांगितलं होतं. दुसऱ्या मुलांसोबत लग्नास माझा विरोध होता. त्यामुळे संबंधित मुलासोबत मी स्वमर्जीने पळून गेलो, असं म्हटलं आहे. तसेच मिरचीपूड फेकल्याची जो गुन्हा दाखल केला आहे. तो खोटा असल्याचंही तरुणीने प्रतिज्ञापत्रात सांगितलं आहे.

# ...तर देशापुढे पुणे शहराचे आदर्श उदाहरण असेल : संजय करोल

पुणे : आपण न्यायाधीश, अधिकारी किंवा अन्य कोणीही असलो, तरीही आपण सर्वप्रथम या देशाचे नागरिक आहोत, हे कायम लक्षात ठेवा. लोकअदालत, मध्यस्थीद्वारे आपले शहर अधिकाधिक खटले मुक्त कसे होईल, यादृष्टीने काम करा, तसे झाल्यास देशापुढे पुणे शहराचे आदर्श उदाहरण निर्माण होईल.' असे मत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश संजय करोल यांनी शनिवारी व्यक्त केले.

पुणे महापालिका व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या विधी महाविद्यालय (पीडीईए) यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी (यशदा) येथे महानगरपालिका प्रशासन आणि न्यायशास्त्र' या विषयावर विधी परिषद घेण्यात आली. यावेळी मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश रेवती मोहिते-डेरे, महापालिका आयुक्त नवल किशोर राम, पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.राम भुजबळ, माजी अध्यक्ष ॲड. शिवाजीराव पाटील, पीडीईए विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रंजना पाटील, महानगरपालिकेच्या मुख्य विधी अधिकारी डॉ.निशा चव्हाण उपस्थित होत्या. न्यायाधीश करोल यांच्या हस्ते महापालिकेच्या ३५ वकिलांच्या पॅनलमधील सर्वोत्कृष्ट ३ वकिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. डॉ. चव्हाण यांनी स्वतः साकारलेली चित्र कलाकृती करोल, मोहिते-डेरे व राम यांना दिली.



न्यायाधीश करोल म्हणाले, कायद्याची सखोल जाणीव आणि सक्षम समज असलेले अधिकारी हे पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासनासाठी अत्यावश्यक आहेत. २००३ पूर्वीचे व आताचे पुणे शहर यामध्ये खुप बदल झाला आहे. पुण्याचा विकास चांगल्या पद्धतीने झाला आहे. हे शहर याच पद्धतीने टिकवून ठेवण्याची जबाबदारी आता तुमच्यावर आहे. शहराच्या सुधारणेमध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सहभागा इतकाच नागरिकांचा सहभागही महत्त्वाचा आहे, हे लक्षात घेऊन लोकसहभागाला प्राधान्य द्यावे.'न्यायाधीश रेवती मोहिते-डेरे म्हणाल्या, शहरातील नागरिकांसाठी गरजेची असलेली कारवाई अनेकदा अधिकाऱ्यांना करावी लागते. त्यावेळी अधिकाऱ्यांना विरोध, संघर्षाला सामोरे जावे लागते. त्यावेळी कायदा तुम्हाला संरक्षण देण्याचे काम करतो. या संरक्षणामुळे तुम्ही तुमची जबाबदारी, कर्तव्ये तितक्याच चांगल्या पद्धतीने पार पाडू शकता. शहरात कोणत्याही प्रकारची कारवाई करताना त्यामध्ये प्रामाणिकपणा असला पाहीजे, याकडे कायम लक्ष देण्याची गरज आहे.'आयुक्त राम म्हणाले,कार्यक्षम सार्वजनिक सेवा, शाश्वत विकास, पायाभूत सोई-सुविधा आणि पारदर्शक नागरी प्रशासन सुनिश्चित करण्यासाठी सक्षम व भक्कम कायदेशीर चौकटीची आवश्यकता असते. त्यादृष्टीने महापालिका प्रशासन कायदेशीर पद्धतीने काम करण्यास प्राधान्य देते.' महानगरपालिका प्रशासनातील कायदेशीर जाणीव, पारदर्शकता आणि संस्थात्मक उत्तरदायित्व बळकट करण्या च्या दिशेने ही परिषद एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरली' असे डॉ.चव्हाण यांनी सांगितले.

# 'हिंद-दी-चादर' निमित्त आयोजित उपक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे - विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार

पुणे । प्रतिनिधी

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्य शासनाच्या वतीने 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमांतर्गत पुणे विभागातील पाचही जिल्ह्यांमध्ये विविध उपक्रम आणि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिली आहे. या उपक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे असेही आवाहन त्यांनी केले आहे.




श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठी दिलेले अभूतपूर्व बलिदान आणि त्यांचे विचार जनसामान्यांपर्यंत, विशेषतः तरुण पिढीपर्यंत पोहोचवणे हा या आयोजनाचा मुख्य उद्देश आहे. पुणे विभागातील पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, सांगली या पाचही जिल्ह्यात शैक्षणिक उपक्रम, आरोग्य पंधरवडा, स्वच्छता व जनजागृती तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम आदींचे आयोजन करण्याच्या सूचना डॉ. पुलकुंडवार यांनी दिल्या आहेत.

याअंतर्गत सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध, वक्तृत्व आणि चित्रकला स्पर्धा, प्रभात फेऱ्यांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसिद्ध गायक सतिंदर सरताज यांनी गायलेले भक्तीगीत शाळा आणि सार्वजनिक ठिकाणी ऐकवले जाणार आहे. श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावरील माहितीपट शाळा व सार्वजनिक ठिकाणी दाखवले जाणार आहेत. शाळा, महाविद्यालये आणि संस्थांनी त्यांच्या उपक्रमांची माहिती आणि जिओ टॅग केलेले फोटो शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://gurutegbahadurshahidi.com अपलोड करणे आवश्यक आहे.

१० फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपूर्ण विभागात 'आरोग्य पंधरवडा' राबवला जात असून, ठिकठिकाणी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली आहेत. ग्रामपंचायत आणि नगरपालिका क्षेत्रांत विशेष स्वच्छता मोहिमा, प्रभात फेऱ्या आणि विशेष ग्रामसभांच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. या ऐतिहासिक सोहळ्यात शीख, सिंधी, बंजारा लबाना, सिकलीकर, मोहियाल, वाल्मिकी, उदासीन आणि वारकरी संप्रदायांसह सर्व सामाजिक संस्थांनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे तसेच त्याची माहिती संकेतस्थळावर अपलोड करावी, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले आहे.

# लंडनमधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची भेट

**पुणे । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी लंडन येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला भेट दिली. उपसभापती डॉ. गोऱ्हे सध्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या इंग्लंड अभ्यास दौऱ्यावर आहेत.**



उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिल्पाला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या पवित्र स्मृतीला वंदन केले. केंद्र सरकारच्या नेहरू सेंटरचे श्री. रवींद्रचंद्रन यांनी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचा सत्कार केला. यावेळी, लंडन महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष वृषाल खांडके, वैभव खांडगे, केंद्र सरकारच्या नेहरू सेंटरचे श्री. रवींद्रचंद्रन, स्मारक व्यवस्थापक श्री. फहद, उद्योजिका अनुश्री चौगुले उपस्थित होते.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हिवाळ्यात कडाक्याच्या थंडीत अभ्यास करून शिक्षण पूर्ण केले. महाराष्ट्र शासनाने या निवासस्थानाला शासकीय दर्जा दिला असून, येथील व्यवस्था शासनातर्फे उत्तम राखली जात आहे. स्मारकाची देखभाल, सुशोभीकरण अधिक समृद्ध करण्यासाठी आणि येथील कर्मचारी वर्गास मान्यता देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल. या स्मारकाच्या गौरवासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट, केंद्रीय समाज कल्याण राज्यमंत्री रामदास आठवले व निवृत्त सरन्यायाधीश भूषण गवई यांचे सतत लक्ष असल्याचे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी अधोरेखित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स (डडए) मध्ये शिक्षण घेत असताना १९२१-२२ या काळात ज्या घरात वास्तव्य केले होते, ते घर आता 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर हाऊस' म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्र शासनाने २०१५ मध्ये हे घर खरेदी करून स्मारकात रूपांतरित केले आहे. हे स्मारक किंग हेन्रीज रोड, कॅम्डन, लंडन येथे आहे. येथे बाबासाहेबांच्या जीवनातील छायाचित्रे, काही वैयक्तिक वस्तू आणि त्यांच्या कार्याचे प्रदर्शन घडते. डॉ. आंबेडकर यांच्या स्मारकाचे महत्व अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

# हडपसरमध्ये मजुरांच्या वसाहतीत आग; १९ झोपड्या जळून खाक

**पुणे । प्रतिनिधी**

हडपसर भागातील राममनोहर लोहिया उद्यानाजवळ असलेल्या मजुरांच्या वसाहतीत शनिवारी मध्यरात्री आग लागली. आगीत १९ झोपड्या, तसेच तीन दुचाकी जळून खाक झाल्या आहेत. आग लागल्यानंतर मजूर, तसेच कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली.

अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. आगीमागचे कारण समजू शकले नाही.

पुणे-सोलापूर रस्त्यावर राममनोहर लोहिया उद्याना आहे. उद्यानाच्या मागील बाजूस मजुरांची वसाहत आहे. मध्यरात्री अडीचच्या सुमारास वसाहतीतील एका झोपडीला आग लागली. झोपड्या तात्पुरत्या स्वरुपात बांबू आणि पत्र्याचा वापर करुन बांधण्यात आल्या आहेत. गृहोपयोगी साहित्याने पेट घेतल्यानंतर आग भडकली. आग भडकल्यानंतर शेजारी असलेल्या झोपड्यांनी पेट घेतला. आग लागताच वसाहतीतील मजूर आणि कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पाच बंब, टँकर घटनास्थळी दाखल झाले. आग भढकल्याने जवानांनी चहुबाजूंनी पाण्याचा मारा सुरू केला. दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. आगीत १९ झोपड्या भस्मसात झाल्या, तसेच तीन दुचाकीही जळल्या. आगीत कपडे, धान्य, तसेच अन्य साहित्य जळाले. मध्यरात्री आग लागल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. मात्र, प्रसंगावधान राखून मजूर आणि कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. अग्निशमन अधिकारी प्रमोद सोनवणे, विलास दडस यांच्या मार्गदर्शनाखाली जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली.

# दहावीच्या पहिल्याच पेपरला ११ कॉपी प्रकरणे; पुणे विभागात सर्वाधिक प्रकार

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ आयोजित दहावीच्या पहिल्याच पेपरला राज्यभरात कॉपीच्या ११ घटना उघड झाल्या. यांपैकी १० प्रकरणे पुणे विभागात, तर एक नागपूर विभागात आढळले. इतर विभागांत कॉपीचे प्रकार शून्य राहिल्याची माहिती मंडळाने परिपत्रकाद्वारे दिली.



शुक्रवारी सकाळच्या सत्रात दहावीचा मराठी विषयाचा पेपर झाला. त्याच वेळी ही प्रकरणे समोर आली. दुपारच्या सत्रातील परकीय भाषेच्या पेपरला एकही कॉपी झाली नाही. दरम्यान, बारावीच्या सकाळच्या सत्रातील अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विषयाचा पेपरही कोणत्याही गैरप्रकारांशिवाय पार पडला. बहुतांश परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित केल्याने यंदा कॉपीप्रकरणे तत्काळ उघडकीस येत असून, दोषींवर कडक कारवाई करण्यात येत आहे. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण अशा नऊ विभागाच्या माध्यमाद्वारे ही परीक्षा घेतली जात आहे.

# आरटीई प्रवेश नियमांमध्ये बदल; आम आदमी पार्टीचा सुप्रीम कोर्टात जाण्याचा इशारा

पुणे । प्रतिनिधी

गेल्या काही वर्षांपासून शासनाकडून आरटीई प्रवेशप्रक्रियेतील नियमांत सातत्याने बदल होत आहेत. या नियमांतील बदलांमुळे गरीब घटकातील मुले मोफत शिक्षणापासून वंचित राहत आहेत. शासनाने तातडीने नियमांमध्ये होणारे बदल थांबवावेत, अन्यथा आम्ही सुप्रीम कोर्टात जाऊ, असा इशारा आम आदमी पार्टीचे मुकुंद किर्दत यांनी पत्रकार परिषदेत दिला.

गरीब आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्यासाठी लागू असलेल्या बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा (आरटीई) अंतर्गत खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांसाठी यंदा प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र, या वर्षी विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किलोमीटरच्या परिघातील शाळांनाच प्रवेश मर्यादित करण्याचा शासनाचा निर्णय वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. ही अट कायद्याच्या मूळ तरतुदींच्या विरोधात असून, ती बेकायदेशीर असल्याचा आरोप आम आदमी पार्टीचे नेते मुकुंद किर्दत यांनी पत्रकार परिषदेत केला. या वेळी झालेल्या पत्रकार परिषदेत किर्दत यांच्यासोबत श्रीकांत भिसे, राहुल तिवारी, गणेश खेंगरे उपस्थित होते.२०१३ च्या नियमांनुसार २५ टक्के राखीव प्रवेशप्रक्रियेत प्रथम एक किलोमीटर परिसरातील विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाते आणि त्यानंतर तीन किलोमीटर अंतरातील विद्यार्थ्यांना शिल्लक जागांवर प्रवेश देण्याची स्पष्ट तरतूद आहे. मात्र, नव्या शासनादेशानुसार तीन किलोमीटरपर्यंतची संधी काढून टाकण्यात आली आहे. त्यामुळे एक किलोमीटरबाहेरील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधीच उरणार नाही, यामुळे आमचा याला विरोध असून, या नियमात तत्काळ बदल करावेत. अन्यथा, आम्ही सुप्रीम कोर्टात जाणार आहे, असेही किर्दत यांनी सांगितले.